


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २७३ ■ रविवार, दि. १२ एप्रिल २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

## अमेरिका-इराण चर्चा निष्फळ!

**इस्लामाबाद :** अमेरिका आणि इराण यांच्यात पाकिस्तानात झालेली शांतता चर्चा अखेर काही मुद्यांवरून फिस्कटली असून ती निष्फळ ठरली आहे. यासाठी इराणने अमेरिकेलाच जबाबदार धरले. अमेरिकेच्या मागण्या अवास्तव होत्या असे म्हणत, चर्चा अपयशी ठरल्याचे खापर इराणने अमेरिकेवरच फोडले. तर यासंदर्भात घोषणा करताना अमेरिकेचे उपराष्ट्रपती जे.डी. व्हॅन्स यांनी इराणने अमेरिकेच्या अटी मान्य करण्यास स्पष्ट नकार दिला, असे म्हटले आहे. महत्वाचे म्हणजे, चर्चा फिस्कटल्यानंतर व्हॅन्स इराणला कोणतीही पूर्वसूचना न देताच तडकाफडकी वॉशिंग्टनला रवाना झाले.

# कत्तलखान्यांवर छापा टाकत 31 गोवंशांची सुटका

## ▶▶अकोल्यात ऑपरेशन प्रहार अंतर्गत मोठी कारवाई ▶▶अशीच मोठी कारवाई अकोट फाईल मध्ये आवश्यक





प्रतिनिधी १२ एप्रिल

**अकोला:** अकोला पोलीस दलाने 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत अवैध धंद्यांविरुद्ध आपली धडक मोहीम तीव्र केली आहे. आज रविवारी पहाटेच्या सुमारास ताजनापेठ परिसरात पोलिसांनी मोठी कारवाई करत अवैध कत्तलखान्यांचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी ३१ गोवंशाची सुटका केली असून ७ ते ८ अवैध गोदामांवर छापे टाकले आहेत. रामदास पेठ पोलिस स्टेशनमध्ये सुरु असलेल्या या अवैध कत्तल खान्याला कोणाचा आशिर्वाद होता असा प्रश्न या निमित्त चर्चिला जात असून अशाच प्रकारची धाडसी कारवाई एसपींनी अकोट फाईल पोलिस स्टेशन अंतर्गत करण्याची गरज गोवंश प्रेमींनी व्यक्त केली आहे.

अकोल्याचे पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी दिलेल्या माहितीनुसार, ताजनापेठ परिसरात मोठ्या प्रमाणात गोवंशाची कत्तल होणार असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे आज रविवारी (१२ एप्रिल) पहाटे ५ ते ६च्या दरम्यान ही धाडसी कारवाई करण्यात आली. या मोहिमेत सिटी डीवायएसपींची टीम, रामदासपेठ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक, आरसीपी पथक, डीबी स्क्वॉड आणि इतर डीवायएसपींच्या पथकांनी सहभाग घेतला होता. कत्तलखान्यांमध्ये असलेल्या ३१ जनावरांची पोलिसांनी सुखरूप सुटका केली आहे. या सर्व जनावरांना आता गोरक्षण संस्थेत पाठवण्यात येणार आहे. ज्या गोदामांमध्ये हे अवैध कृत्य सुरू होते, त्या ठिकाणांच्या मालकांविरुद्ध रामदासपेठ पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. हे कत्तलखाने



कायमस्वरूपी सील करण्यात यावेत, यासाठी पोलीस प्रशासनातर्फे महानगरपालिकेला पत्र पाठवण्यात येणार आहे. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी सांगितले की, 'हे गोवंश कोठून आणले गेले आणि ते कोणाला पुरवले जाणार होते, याचा सखोल तपास केला जात आहे. या प्रकरणात सहभागी असणाऱ्या सर्व आरोपींना अटक करून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. अकोला पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे अवैध धंदे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. जिल्ह्याभरात अशा प्रकारची कारवाई यापुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

### हिंदूत्वाच्या नावावर मत मागणाऱ्या भाजपाचे दूर्लक्ष

हिंदूत्वाच्या मुद्दांवर गोवंश कत्तल या विषयावर रान उठविणारी भाजपा अकोल्यात गप्प का असा प्रश्न उपस्थित होतो. शहरात ठिकठिकाणी गोवंश कत्तल होत असताना महापालिकेतील सत्तारुढ भाजप आणि भाजप नेते गोवंश कत्तलीच्या मुद्यांवर मात्र मुग गिळून बसतात. त्यामुळे हिंदूत्वाच्या नावावर मत मागणी भाजपा शहरातील गोवंश कत्तलीचे अवैध ठिकाणी नष्ट करण्यासाठी महापालिका प्रशासनाला आदेश देतील काय असा प्रश्न उपस्थित होत आहे. शहरात ठिकठिकाणी सुरु असलेले हे कत्तलखाने अवैध असून त्याकडे महापालिकेच्या विविध विभागाचे दूर्लक्ष अधोरेखित होत आहे. इतकेच नाही तर महापालिकेचे अधिकारी शासकीय जागेत सुरु असलेले अवैध कत्तलखाने बंद करण्यात अपयशी ठरले असून सत्तारुढ भाजपाचे आता तरी डोळे उघडतील काय अशी विचारणा होत आहे. आज पोलिस अधीक्षकांनी थेट महापालिका प्रशासनाला अशा अवैध जागा सिल करण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले आहे.

### तत्कालिन जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश पाळले असते तर.....

शहरात मोठ्या प्रमाणावर सुरूअसलेल्या अवैध गोवंश कत्तलीच्या विरोधात अकोला पोलिसांनी धडक कारवाई करत ३१ गोवंश वाचविण्यात यश मिळवले आहे. ताजनापेठ परिसरातील एका मोठ्या अड्ड्यावर धाड टाकून पोलिसांनी ही कारवाई केली. या प्रकरणी ७ ते ८ गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरूअसल्याची माहिती पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी दिली आहे.एकीकडे पोलीस प्रशासन कारवाई करत असताना, दुसरीकडे महानगरपालिका प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. तत्कालीन जिल्हाधिकारी निमा अरोरा यांनी अवैध कत्तलखाने सील करण्याचे स्पष्ट आदेश दिले होते. मात्र, महापालिका प्रशासनाला या आदेशाचा विसर पडल्याचे चित्र दिसत आहे. एकाच ठिकाणी वारंवार पोलिसांना कारवाई करावी लागत आहे. जर महापालिकेने हे ठिकाण कायमस्वरूपी सील केले असते, तर हा प्रकार थांबला असता. मात्र, महापालिकेच्या दुर्लक्षामुळे शहरातील ताजनापेठ परिसर गोवंश कत्तलीचा मोठा अड्डा बनला आहे.

## अकोला पुन्हा तापले; तापमान 42 अंशांवर!

प्रतिनिधी १२ एप्रिल

**अकोला :** मार्चमध्ये तापमानाची उच्चांकी नोंद झाल्यानंतर वातावरणात बदल होऊ काही भागात अवकाळी पावसासह गारपीट झाली होती. त्यामुळे तापमानाचा पार खाली आला होता. दरम्यान १५ दिवस पावसाळी आणि ढगाळ वातावरणामुळे अकोलेकरांना दिलासा मिळाला असतानाच एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यापासून तापमान पुन्हा वाढण्यास सुरूवात झाली. शनिवारी अकोल्याचा पारा ४२ अंशावर पोहोचला होता. हे तापमान विदर्भात सर्वाधिक होते.

एप्रिलमध्ये पश्चिम दिशेकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळे गेल्या काही दिवसांमध्ये दिलासादायक तापमान होते. ३५ ते ४० अंशांदरम्यान हे तापमान होते. गुरुवारी वाऱ्यांच्या दिशेमध्ये बदल झाला आणि हे वारे पूर्वेकडून वाहायला लागले. त्यामुळे विदर्भाच्या तापमानात वाढ झाल्याचे हवामान विभागाचे म्हणणे आहे. आता अकोला पुन्हा तापायला लागले असून, शनिवारी ४२ अंशांवर तापमान पोहोचता दुपाऱ्या सुमारास रस्ते सुनसान दिसत होते. नागरिक घराबाहेर पडताना तोंडाला डोक्याला बांधून निघत असल्याचे दिसून येत होते. या तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यताही व्यक्त करण्यात आल्यामुळे येत्या काही दिवसात अकोलेकरांच्या जीवाची लाही-लाही होईल, हे निश्चित.

### दिवसाच्या व रात्रीच्या तापमानात फरक

दिवसा प्रंचड उष्णतामान अन् रात्री तापमानात घट होत असल्याने अकोलेकरांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. शनिवारी अकोल्याचे कमाल तापमान ४२ अंश तर किमान तापमान २१ अंश होते. त्यामुळे रात्रीच्या सुमारास उकाड्या घट होत असल्याचे दिसून येत आहे.

## सत्तेतील मित्र पक्षांचीच शिकार होणार!

प्रतिनिधी १२ एप्रिल

**पुणे :** राज्याच्या राजकारणात अशोक खरात प्रकरणामुळे वेगळेच वळण मिळाले आहे. अशोक खरातप्रकरणामुळे सत्तेतील आणि विरोधातील अनेक नेत्यांचे राजकीय भवितव्य धोक्यात आलेले आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी धक्कादायक दावा केला आहे. सत्तेतील मोठ्या पक्षाकडूनच सत्तेतील मित्रांची शिकार केली जाणार असल्याचा दावा रोहित पवारांनी एक्स पोस्टवरून केला आहे.

भाजपचे सत्तेतले मित्रपक्ष विरोधी पक्षाचे आमदार खासदार फोडणार असल्याच्या बातम्या बघितल्या, परंतु वस्तुस्थिती मात्र वेगळीच आहे, पुढच्या महिन्याच्या शेवटपर्यंत सत्तेतल्या मोठ्या पक्षाकडून सत्तेतल्या त्यांच्या मित्रांचीच शिकार केली जाणार असल्याची पक्की माहिती आहे, असे रोहित पवार म्हणाले. पुढे त्यांनी अशोक खरात प्रकरणावरही भाष्य केले.

## सत्तारुढ नगरसेवकांचे दार ठोठावले.... विरोधकांचा ६०० रुपयांना विरोध

प्रतिनिधी १२ एप्रिल

**अकोला:** अकोला महानगरपालिकेच्या १३ एप्रिल रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेत शहरातील प्रत्येक घराकडून कचरा घंटागाडीसाठी ६०० रुपये प्रतिवर्ष शुल्क आकारण्याचा प्रस्ताव मांडला जाणार आहे. या प्रस्तावाला आता राजकीय आणि सामाजिक स्तरावर तीव्र विरोध सुरू झाला आहे. विरोधातील काँग्रेस, वंचित आणि उध्दव सेनेच्या नगरसेवकांनी सर्व ८० नगरसेवक-नगरसेविकांना पत्र लिहून या अन्यायाविरुद्ध ठाम भूमिका घेण्याचे आवाहन केले आहे. महापौरांना याविषयीचे निवेदन देण्यात आले. महाराष्ट्रातील अनेक 'अ', 'ब' आणि 'क' वर्ग महानगरपालिकांमध्ये अशा प्रकारचे स्वतंत्र शुल्क आकारले जात नाही. मालमत्ता कर आणि इतर स्थानिक करांमधूनच स्वच्छतेचा खर्च भागविला जातो.



असे असताना अकोलेकरांवर अचानक ६०० रुपयांचा हा अतिरिक्त आर्थिक भार लादणे अन्यायकारक आहे. अकोला शहरातील सध्याच्या स्वच्छता व्यवस्थेवरही ताशेरे ओढण्यात आले आहेत. शहरातील अनेक भागात घंटागाडी वेळेवर येत नाही आणि कचरा उचलण्याचे कोणतेही प्रभावी नियोजन नाही. सेवा सुधारण्याऐवजी थेट जनतेकडून पैसे वसूल करणे म्हणजे अकार्यक्षम व्यवस्थेचा आर्थिक बोजा जनतेवर टाकण्याचा प्रकार आहे. नगरसेवक हे जनतेचे लोकप्रतिनिधी आहेत, त्यामुळे जनतेच्या हिताचे रक्षण करणे हे त्यांचे कर्तव्य आहे. १३ एप्रिलच्या सभेत या प्रस्तावाला सर्वांनी विरोध करून तो नामंजूर करावा, अशी मागणी विरोधी पक्षनेता डॉ.जीशान हुसेन यांनी केली आहे. तसेच, कोणताही अंतिम निर्णय घेण्यापूर्वी नागरिकांचे मत, आक्षेप आणि सूचना विचारात घेणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.'अकोलेकरांवर लादला जाणारा हा ६०० रुपयांचा बोजा जनविरोधी आहे. सर्व नगरसेवकांनी पक्षापलीकडे जाऊन अकोल्याच्या जनतेसाठी या प्रस्तावाचा विरोध करावा.' असे आवाहन विरोधी पक्षनेता डॉ.हूसेन यांनी केले आहे.

## ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचे निधन!



प्रतिनिधी १२ एप्रिल

**मुंबई :** ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांनी मुंबईतल्या ब्रीच कँडी रुग्णालयात रविवारी अखेरचा श्वास घेतला आहे. वयाच्या ९२ व्या वर्षी त्यांची प्राणज्योत मालवली. आपल्या चिरतरुण आवाजाने सगळ्या जगाला भुरळ घालणाऱ्या आशा भोसले या आज काळाच्या पडद्याआड गेल्या आहेत.

आशा भोसले यांच्या छातीत संसर्ग झाल्याने त्यांना शनिवारी रात्री उशिरा ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आज रविवार, १२ एप्रिल रोजी आशा भोसले यांचे पुत्र आनंद भोसले यांनी आशा भोसले यांच्या निधनाची माहिती दिली. त्यांच्या जाण्याने हिंदी चित्रपटसृष्टी, गायन क्षेत्र आणि कला क्षेत्रावर शोककळा पसरली आहे. आशा भोसलेंचे अवयव निकामी होत गेल्यामुळे त्यांना शनिवारी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आज त्यांची प्राणज्योत मालवली आहे. सोमवारी सकाळी ११ ते २ या वेळेत लोअर परळ या ठिकाणी त्यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे.

### सर्वाधिक गाणी गाणारी गायिका!

आशा भोसले यांचा जन्म सांगली या ठिकाणी झाला होता. वयाच्या १० व्या वर्षापासून त्यांनी गायनाला सुरुवात केली होती. गिनिज बुकात सर्वाधिक गाणी गाणारी गायिका अशी त्यांची नोंद झाली आहे. आपल्या वेगळया आवाजाची भुरळ सगळ्या जगाला पडली होती. त्या जरी आपल्याला सोडून गेल्या असल्या तरीही त्यांचं गाणं कायमच आपल्या सोबत राहणार आहे. तो आवाज कायमच आपल्याला साथ देईल यात शंका नाही.

## आता रुग्णांना अवघ्या 8 तासांत कळवला जाणार मदतीचा निर्णय!

### ऑनलाइन प्रक्रिया ; मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत बदल



प्रतिनिधी १२ एप्रिल

**मुंबई :** मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत मोठा बदल करण्यात आला आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीची सर्व कागदपत्रे आणि निर्णय घेण्याची प्रक्रिया आता पूर्णपणे ऑनलाइन होणार आहे. यामुळे रुग्णांना किंवा त्यांच्या नातेवाईकांना मंत्रालयातील चकरा मारण्याची गरज उरणार नाही. यापूर्वी रुग्णांना स्वतः अर्ज करावा लागायचा. आता संबंधित रुग्णालयांनाच रुग्णाची कागदपत्रे पोर्टलवर अपलोड करावी लागतील. यासाठी प्रत्येक रुग्णालयाला स्वतंत्र 'लॉगिन' आणि 'पासवर्ड' दिला जाईल, अशी माहिती समोर आली आहे.

दरम्यान, अर्ज अपलोड केल्यानंतर ३ ते ८ कार्यालयीन तासांच्या आत मदतीचा निर्णय रुग्णालय आणि नातेवाईकांना कळवला जाईल. कागदपत्रे उशिरा अपलोड झाल्यास दुसऱ्या दिवशी कार्यालयीन वेळेत निर्णय दिला जाईल. तसेच मंजूर झालेली पूर्ण रक्कम एकाच वेळी न देता, सुरुवातीला ३० टक्के रक्कम आणि उर्वरित रक्कम रुग्णाला डिस्चार्ज मिळताना दिली जाईल, अशी देखील माहिती आहे.

### सहायता निधीसाठी नवे ऑनलाईन पोर्टल सुरू

सर्वसामान्य रुग्णांसाठी जीवनदायिनी ठरलेल्या मुख्यमंत्री सहायता निधीच्या अर्ज प्रक्रियेसाठी नवीन ऑनलाईन पोर्टल विकसित करण्यात आले असून, ७ एप्रिल २०२६ पासून जुनी पद्धत पूर्णपणे बंद करण्यात आली आहे. यापुढे सर्व अर्ज फक्त ऑनलाईन माध्यमातूनच स्वीकारले जाणार आहेत. रुग्णालयांनी आपला अधिकृत ई-मेल आयडी नोंदवून युजर आयडी व पासवर्ड प्राप्त करणे तसेच ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक आहे.

### कॅन्सरग्रस्त मुलांच्या उपचारांसाठी त्रिपक्षीय करार, मोफत उपचार

२०२५ मध्ये या निधीतून ४०,७७६ रुग्णांना सुमारे ३३३.६ कोटी रुपयांची मदत करण्यात आलीय. आता कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीच्या माध्यमातून ही मदत आणखी वाढवण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. तर कॅन्सरग्रस्त मुलांच्या उपचारांसाठी टाटा मेमोरियल हॉस्पिटल आणि 'भारत पेट्रोलियम' सोबत त्रिपक्षीय करार करण्यात आला आहे. यामुळे अशा मुलांना मोफत उपचार मिळण्यास मदत होईल.

## आयटी कंपनीतील धर्मांतराच्या रॅकेटचा एसआयटीकडून तपास!

**नाशिक :** नाशिकमधील मुंबई नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका मल्टिनॅशनल आयटी कंपनीतील महिलांवरील लैंगिक शोषण प्रकरणाने खळबळ उडाली आहे. कंपनीतील काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी संगनमत करून आर्थिकदृष्ट्या दुर्बल पार्श्वभूमीतील महिला व तरुणींना लक्ष्य केल्याचा आरोप आहे. त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन लैंगिक अत्याचार, आर्थिक छळ तसेच जबरदस्तीने धर्म स्वीकारण्यास भाग पाडल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी नाशिकमध्ये ९ गुन्हे दाखल झाले असून आता एसआयटीकडून या प्रकरणाची सखोल चौकशी सुरु आहे.




CMYK CMYK

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
रविवार, दि. १२ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## दिवसभरात किती पाणी प्यायला हवे!

चेहऱ्यावरती ग्लो येण्यासाठी व फिट राहण्यासाठी आपल्याला प्रत्येक जण जास्त पाणी पिण्याचे सल्ला देतो. परंतु आपण या गोष्टीचा कधी विचार केला आहे का, आपल्याला दिवसातून किती पाणी प्यायला हवे? किंवा आपल्या शरीराला किती पाण्याची गरज आहे? नाही ना. तर चला आज आपण याबद्दल माहिती पाहणार आहोत. रोज किती पाणी प्यावे हे माहीत करण्यासाठी सर्वात अगोदर तुम्ही तुमचे वजन मोजा आणि जे वजन येईल त्याला ३० ने डिव्हाइड करा व नंतर जी संख्या येईल तेवढेच लिटर पाणी आपल्याला दिवसातून प्यायचे आहे.

जसे की- समजा, तुमचे वजन ६०किलो आहे. त्याला ३० ने डिवाइड करा. म्हणजे २ येईल. त्यामुळे तुम्हाला दिवसातून दोन लिटर पाणी पिणे आवश्यक आहे.

# वेट ट्रेनिंग आणि महिलांचे आरोग्य

**वेट ट्रेनिंग हे पुरुषांसाठीच जास्त उपयोगी आहे, महिलांनी वजन उचलणे चुकीचे आहे, जर महिला जिममध्ये जाऊन वजन उचलतील तर त्या पुरुषांसारख्या दिसतील, महिलांसाठी योगा, झुंबा, एरोबिक्स, वॉकिंग, रनिंग इत्यादी व्यायामच जास्त योग्य असतात – असे अनेक वाक्ये आपल्याला रोज ऐकायला मिळतात.**
**पण प्रत्यक्षात वेट ट्रेनिंग म्हणजे नेमके काय? आणि त्याचा महिलांच्या आरोग्यावर खरोखर चांगला परिणाम होतो की नाही, हे समजून घेणे खूप महत्त्वाचे आहे.**



सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास, वेट ट्रेनिंग हा असा एक व्यायामाचा प्रकार आहे ज्यामध्ये स्नायूंना (Muscles) म्हणजेच वजनाच्या मदतीने हालचाल (Movement) दिली जाते आणि त्यामुळे ते अधिक मजबूत बनतात.

या प्रक्रियेत ताकद आणि प्रयत्न (Efforts) लागतात. स्नायूंचे सर्वात महत्त्वाचे काम म्हणजे शरीराला हालचाल करायला मदत करणे आणि आवश्यक ते प्रयत्न करणे.

स्नायू प्रत्येक मानवाच्या शरीरात असतात — मग तो स्त्री असो किंवा पुरुष.

फक्त पुरुष आणि महिलांच्या शरीरात reproductive system नुसार स्नायू (Muscle) आणि चरबी (Fat) यांचे प्रमाण वेगवेगळे असते. महिलांसाठी आदर्श शरीरातील चरबीचे प्रमाण साधारणपणे २०% पेक्षा कमी आणि पुरुषांसाठी १५ % पेक्षा कमी असणे आरोग्यासाठी योग्य मानले जाते.

येथे आपण महिलांसाठी muscles training स्नायूंचे प्रशिक्षण म्हणजेच वेट ट्रेनिंग का आवश्यक आहे, आणि ते त्यांच्या आरोग्यासाठी कसे फायदेशीर ठरते, हे पाहणार आहोत.

महिलांच्या शरीरात इस्ट्रोजेन आणि पुरुषांच्या शरीरात टेस्टोस्टेरॉन हे महत्त्वाचे हार्मोन्स असतात.

या हार्मोन्समुळे पुरुष आणि महिलांची शरीररचना एकमेकांपेक्षा वेगळी असते.

टेस्टोस्टेरॉन हे हार्मोन पुरुषांच्या शरीराला मस्क्युलर लूक देण्यात महत्त्वाची भूमिका बजावते, तर इस्ट्रोजेन हे हार्मोन महिलांच्या शरीराची रचना आणि वैशिष्ट्ये टिकवून ठेवण्यास मदत करते.

या हार्मोन्समुळे प्रत्येकाची शरीररचना त्यांच्या कार्यानुसार नैसर्गिकरित्या तयार झालेली असते.

म्हणूनच एखादी महिला जरी प्रयत्न केला तरी तिचे शरीर पुरुषांसारखे जास्त मस्क्युलर होणे सहज शक्य नसते.

यामुळे महिलांसाठी वेट ट्रेनिंग पूर्णपणे सुरक्षित आणि अत्यंत फायदेशीर आहे.

**महिलांकडून होणारी एक सामान्य चूक**

अनेक महिला फक्त वजन कमी करण्याच्या उद्देशाने वेट मशीनवरील आकडे कमी करण्यावर लक्ष देतात, आणि त्यामुळे वेट ट्रेनिंगचे खरे फायदे अनेकदा दुर्लक्षित केले जातात.

परंतु प्रत्यक्षात वेट ट्रेनिंगचे फायदे फक्त वजन कमी करण्यापुरते मर्यादित नसून, ते संपूर्ण आरोग्यासाठी महत्त्वाचे असतात.

महिलांसाठी वेट ट्रेनिंगचे महत्त्वाचे फायदे

**१) हाडांचे आरोग्य सुधारते**

नियमित वेट ट्रेनिंगमुळे बोन डेन्सिटी वाढते, ज्यामुळे हाडे मजबूत होतात आणि भविष्यात फ्रॅक्चर होण्याचा धोका कमी होतो.

**२) शरीराची ठेवण सुधारते आणि शरीर टोन्ड होते**

वेट ट्रेनिंगमुळे शरीराची पोश्चर सुधारते, स्नायू मजबूत होतात आणि शरीर अधिक टोन्ड आणि आकर्षक दिसू लागते.

**३) फॅट लॉसला चालना मिळते** (वजन कमी नव्हे, चरबी कमी) वेट ट्रेनिंगमुळे फॅट लॉस जलद होतो, त्यामुळे शरीर अधिक फिट आणि सुबक दिसते.

कधी कधी वेट मशीन वर आकडे कमी दिसत नाहीत, पण इंचेस मध्ये चरबी कमी झालेली दिसते, कारण मसल्स मजबूत होत असतात.

**४) कार्यक्षम ताकद वाढते (फंक्शनल स्ट्रेंथ)**

दैनंदिन कामे करताना शरीर अधिक मजबूत राहते आणि इंज्युरी होण्याची शक्यता कमी होते.

**५) वृद्धत्वाची प्रक्रिया मंदावते (अँटी-एजिंग प्रभाव)**

वेट ट्रेनिंगमुळे मसल्स टिकून राहतात आणि शरीर जास्त काळ ॲक्टिव्ह आणि युथफुल राहण्यास मदत होते.

**६) मासिक पाळीदरम्यान त्रास कमी होण्यास मदत**

नियमित ट्रेनिंगमुळे ॲब्डोमेन क्रॅम्प्स कमी होऊ शकतात आणि हार्मोन्स संतुलित राहण्यास मदत होते.

**७) गर्भधारणेपूर्व आणि नंतर फायदेशीर**

योग्य मार्गदर्शनाखाली केलेले वेट ट्रेनिंग प्री आणि पोस्ट प्रेग्नन्सी काळात शरीर मजबूत ठेवण्यास मदत करते.

**८) झोपेची गुणवत्ता सुधारते**

नियमित व्यायामामुळे स्लीप क्वालिटी सुधारते, ज्यामुळे शरीर आणि मन दोन्ही ताजेतवाने राहतात.

या सर्वाव्यतिरिक्तही महिलांमध्ये वेट ट्रेनिंगचे अनेक फायदे दिसून येतात.

**९) स्ट्रेस मॅनेजमेंट (तणाव नियंत्रण)**

**१०) बॉडी आकर्षक बनते (शरीर अधिक आकर्षक दिसते)**

**महिलांची ताकद – पुरुषांइतकीच सक्षम**

महिलांची शरीररचना, वैशिष्ट्ये, आव्हाने आणि कार्ये या सर्व गोष्टी पुरुषांपेक्षा वेगळ्या असतात.

पण त्यांच्या कामांच्या दृष्टीने महिला पुरुषांइतक्याच मजबूत आणि सक्षम असतात.

भावनिक आणि शारीरिक या दोन्ही बाबतीत महिला त्यांच्या प्रत्येक जबाबदाऱ्या पूर्ण करण्यास पुरुषांइतक्याच सक्षम आहेत. आजच्या काळात महिला प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने काम करत पुढे जात आहेत. त्याचबरोबर त्यांना कुटुंबाची जबाबदारी, मुलांचा विकास आणि नोकरीतील व्यावसायिक कामेही सांभाळावी लागतात. त्यामुळे महिलांच्या शरीराला आणि क्षमतेला 'मल्टीटास्किंग' असे म्हटले जाते.

**आज बदलत आहे महिलांच्या फिटनेसचा ट्रेंड**

एक चांगली गोष्ट म्हणजे आजकाल जिम मध्ये वर्कआउट करण्याचा ट्रेंड मोठ्या प्रमाणात बदलत आहे.

अनेक महिला आता वेट ट्रेनिंग आवडीने करत आहेत आणि त्याचे फायदेही अनुभवत आहेत.

पूर्वी १०० किलो स्क्वॅट सारखे व्यायाम फक्त तरुण मुलगे करताना दिसायचे, पण आज जिममध्ये अनेक मुली आणि महिला स्क्वॅट, डेडलिफ्ट आणि बेंच प्रेस सारखे स्ट्रक्चरल लिफ्ट्स सहजपणे करताना दिसतात.

हेच दाखवते की महिलाही स्ट्रेंथ ट्रेनिंगमध्ये तितक्याच सक्षम आहेत. म्हणूनच महिलाही वेट ट्रेनिंग आत्मविश्वासाने करू शकतात आणि त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी वेट ट्रेनिंग अत्यंत आवश्यक आहे.



गणेश अंभोरे
द फिटनेस हब
फिटनेस प्रोफेशनल अँड न्युट्रिशनिस्ट अकोला

## व्यक्ती विशेष

### बाळाजी विश्वनाथ पेशवे




**आज पुण्यतिथी**

मराठेशाहीच्या इतिहासातील एक मोठे नाव म्हणजे सेनाकर्ते बाळाजी विश्वनाथ भट पेशवे. १६६२ साली श्रीवर्धन येथे जन्म घेऊन कोकणात देशमुखी करणारे बाळाजी आपल्या कर्तृत्वाला वाव मिळावा म्हणून देशावर आले आणि मराठेशाहीच्या विस्ताराचा पाया भक्कम करण्यात मोठी कामगिरी त्यांनी बजावली. त्यांनी १७१३ ते १७२० छत्रपती शाहू महाराजांचे पेशवेपद भूषवले आणि मुघल आक्रमणातून सावरलेल्या मराठा संघराज्याला पुढची दिशा आखून दिली. श्रीवर्धन शहरात जिथं त्यांचा वाडा होता त्या ठिकाणी आता ब्रॉन्झ धातूचा सुंदर पुतळा उभारून त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला आहे.


महादजी विसाजी भट म्हणजे बाळाजींचे पणजोबा. त्यांच्याकडे श्रीवर्धन व दंडाराजपुरी परिसराची देशमुखी होती. पुढे बाळाजींचे आजोबा व वडील हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या चाकरीत होते असा कयास इतिहासकारांनी मांडला आहे. महादजीचे पुत्र परशुराम उर्फ शिवाजी यांचे पुत्र विश्वनाथ म्हणजे बाळाजींचे वडील. बाळाजींना कृष्णाजी, जानोजी, विठ्ठल आणि रुद्राजी असे चार भाऊ होते. वयाच्या १०-१२ व्या वर्षी त्यांचा बर्वे घराण्यातील राधाबाईंशी विवाह झाला.

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानानंतर कोकणात सिद्दी बलिष्ठ झाला आणि श्रीवर्धन येथील भट कुटुंबाचा त्रास वाढू लागला. सरखेल कान्होजी आंग्रेंना सामील असल्याच्या संशयावरून जानोजी भट यांना पोत्यात बांधून समुद्रात बुडवले असे सांगितले जाते. तेव्हा काही दिवस मुरुड येथे वैशंपायन कुटुंबाकडे आश्रय घेऊन बाळाजी साताऱ्याच्या दिशेने निघाले. सोबत भानू कुटुंबही होते. नाना फडणवीस हे याच भानू घराण्यातील. वैशंपायन घराण्याने मदत केली म्हणून त्यांना कृतज्ञ भावनेतून कुलोपाध्याय नेमले गेले. एका वैशंपायन तरुणाने १२०० सैनिकांची सरदारकी मिळवली व तो मध्य प्रदेशातील सागर येथे गेला असे दिसते.

भानू कुटुंबात तीन भाऊ होते. हरी महादेव, बाळाजी महादेव आणि रामजी महादेव त्यापैकी बाळाजी महादेव हे नाना फडणवीसांचे आजोबा. १७१९ मध्ये मुघलांनी कट करून बाळाजी विश्वनाथ यांना मारण्याचा प्रयत्न केला त्यावेळी आपल्या प्राणांची आहुती देऊन बाळाजी महादेव यांनी बाळाजी विश्वनाथ यांचा जीव वाचवला. पुढे रामचंद्रपंत अमात्य यांच्याकडे कारकून असलेल्या बाळाजींचे गुण धनाजी जाधवराव यांच्या दृष्टीस पडले आणि आपल्याकडे दिवाण म्हणून त्यांची नेमणूक करून घेतली. छत्रपती राजाराम महाराजांचे अकाली निधन झाल्यानंतर त्यांचा लहानगा पुत्र शिवाजी गादीवर विराजमान झाला आणि महाराणी ताराबाई साहेब राज्य चालवू लागल्या. औरंगजेबाचा मृत्यू १७०७ मध्ये झाला आणि त्याचा मुलगा आझमशाहाने स्वतःला बादशहा घोषित केले व शहाआलम शी लढण्यासाठी तो उत्तरेस निघाला. त्यावेळी झुल्फीकारखानाच्या सल्ल्याने त्याने छत्रपती संभाजी महाराजांचे पुत्र शाहू महाराज यांची सुटका केली. येसूबाई मात्र कैदेतच राहिल्या. त्यानंतर ताराराणी आणि छत्रपती शाहूंच्या पक्षात सत्तासंघर्ष झाला. धनाजी जाधवांना बाळाजी विश्वनाथांनी शाहू पक्षात आणले. तिकडे कान्होजी आंगरे ताराराणींच्या पक्षात होते. त्यांनी राजमाची आणि लोहगड जिंकला.. कान्होजींचे पारिपत्य करायला छत्रपती शाहूंनी पेशवा बहिरोपंत पिंगळेंना ससैन्य पाठवले. पण कान्होजी आंगरेंनी त्यांचा प्रभाव करून पेशव्याला कैद केले. त्यानंतर बाळाजी विश्वनाथांनी छत्रपती शाहू महाराजच मराठेशाहीचे योग्य वारसदार असून त्यांचे सहकार्य लाभले तर कान्होजी आंगरे कोकणावर वर्चस्व निर्माण करू शकतील हे त्यांना पटवून दिले आणि छत्रपती शाहू महाराजांची बाजू बळकट झाली. १७१८ साली थोरला मुलगा बाजीराव यासह बाळाजी विश्वनाथ यांनी दिल्ली मोहीम काढली सय्यद बंधूना फर्रुखसियरला पदच्युत करून रफीउद्दौजरात ला बादशाह करण्यास साहाय्य केले. त्या मोबदल्यात सनदा, चौथाईचा हक्क घेऊन बाळाजी विश्वनाथ पेशवे साताऱ्याला आले. खर्च वजा जातात ३० लाखांची मिळकत त्यांनी छत्रपती शाहू महाराजांना नजर केली. याचवेळी महाराणी येसूबाई साहेब आणि राजपरिवाराची सुटकाही करण्यात आली. दिल्ली मोहिमेनंतर आजारी पडलेल्या बाळाजी विश्वनाथ पेशव्याचे १२ एप्रिल १७२० साली निधन झाले आणि थोरले बाजीराव वयाच्या अवघ्या २०व्या वर्षी पेशवेपदावर नियुक्त झाले.

## हरि मुखें गाता हरपली चिंता, त्या नाही मागुता जन्म घेणे


संत एकनाथ महाराज कृत हरिपाठातील ही ध्रूपद रूपी ओवी अत्यंत मार्मिक आहे. पंचरत्न हरिपाठातील शांतीब्रह्म नाथ महाराज यांचे हरिपाठ माउलींच्या हरिपाठाइतके कठीण नाहीत. २९ हरिपाठ त्यात अनेक अभंगाचा कीर्तनकारांनी परमार्थ सेवेत वापर केला आहे. नाथबाबा आपले गुरू जनार्दन स्वामींच्या साक्षीने उपदेश करतात. मनुष्य जन्माचे हित, कल्याण नेमके कशामुळे होईल? याविषयीचे चिंतन त्यांच्या हरिपाठातून केले गेले आहे. मनुष्य जन्मात येऊन वृथा बडबड न करता हरिविषयीच बोलले पाहिजे. ध्यानी, मनी, चिंतनी एकच हरि असला पाहिजे. याच हरिपाठात नाथ महाराजांनी कर्म सिद्धांतही मांडला आहे. केले कर्म झाले तेची भोगा आले, उपजले मेले ऐसे किती. या ओवीद्वारे महाराज म्हणतात, कर्म करीत असताना या पृथ्वीतलावर कित्येक आले गेले याची गणना नाही, परंतु ज्याने संसार करताना भगवंत ओळखला त्याचे नाव अमर राहिले आहे आणि संत अशा लोकांमध्ये असतात. अनेक संतांनी या कार्यात परमार्थ साधना केल्याचे दिसून येते. कलियुगात जगभरात ७०० कोटी लोक वेगवेगळे मुखवटे धारण करून भगवंताने जन्माला घातले आहेत. जन्म घेणे लागे वासनेच्या संगे, तेची झाली अंगे हरिरूप. दोन श्वासातील अंतर म्हणजे जीवन. हे जीवन जगत असताना मनुष्य भगवंताने आपल्याला या भूतलावर कशासाठी पाठवले आहे, हे तो पद्धतशीरपणे विसरतो. सोहम मंत्राचा प्रभाव विसरला की मग कोहम मंत्र सुरू होतो. संसाररूपी भवसागरात मी-माझे हे सुरू होते. श्रीमंतीच्या वैभवात लोळण घेताना आपल्याला एक ना एक दिवस नरदेह सोडून जायचे आहे. आत्मा अमर आहे हे त्याच्या ध्यानी मनी येत नाही. संसार करताना मी-तू पणाची ओळख झाली नाही, अशा माणसांना शेवटच्या क्षणापर्यंत भगवंताचे नाव तोंडात देखील येत नाही. वय झाले आहे, गात्रं शिथिल झाली आहेत, जवळच्या माणसांची ओळख पटत नाही, तेव्हा काही म्हणतात राम म्हणा, ते देखील बोलता येत नाही? या अवस्थेतून जाताना वैभव, श्रीमंती, पैसा, सोने, जड-जवाहिरे आणि सगे-सोयरे कुणीही कामाला येत नाही. शिल्लक राहतो तो केवळ लोकोपवाद, मागे राहते फक्त कीर्ती. म्हणून मरावे परी कीर्ती रूपी उरावे, पण त्या आधी परमार्थ म्हणून हरि मुखाने गावून जीवनाची इतिश्री झाली तर सोन्याहून पिवळे..?



रमेश जे. पाटील
आडगाव ता. चोपडा
मोबाईलः ९८५०९८६१००

## मुलांच्या हातात मोबाईल : काळाची गरज की भविष्यातील धोका?

आजच्या २१ व्या शतकात तंत्रज्ञान आपल्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनले आहे. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत आपण कोणत्या ना कोणत्या स्वरूपात तंत्रज्ञानाशी जोडलेले असतो. यात 'स्मार्टफोन' हे सर्वात प्रभावी साधन ठरले आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत एक गंभीर प्रश्न पालकांसमोर आणि समाजासमोर उभा राहिला आहे, तो म्हणजे– मुलांच्या हातात मोबाईल देणे कितपत योग्य आहे? हा विषय केवळ 'हो' किंवा 'नाही' असा मर्यादित राहिलेला नाही, तर तो मुलांच्या मानसिक, शारीरिक आणि बौद्धिक विकासाशी जोडलेला आहे.



**मोबाईल, शिक्षणाचे एक आधुनिक साधन**

कोरोना महामारीनंतर शिक्षणाचे स्वरूप पूर्णपणे बदलले. शाळा बंद असताना मोबाईलच 'शाळा' बनला होता. आजही मोबाईलचे अनेक सकारात्मक पैलू नाकारता येणार नाहीत:

**माहितीचा खजिना:** गुगल, युट्युब आणि शैक्षणिक ॲप्सच्या माध्यमातून मुले जगातील कोणत्याही विषयाची माहिती एका क्लिकवर मिळवू शकतात.

**नवनिर्मितीला वाव:** कोडिंग, ग्राफिक डिझाइनिंग, परदेशी भाषा शिकणे किंवा चित्रकलेचे नवनवीन प्रकार शिकण्यासाठी मोबाईल उत्तम माध्यम आहे.

संपर्क आणि सुरक्षा: आणीबाणीच्या प्रसंगी मुले आपल्या पालकांशी संपर्क साधू शकतात, हा एक महत्त्वाचा फायदा आहे.

**मोबाईलच्या अतिवापराचे गंभीर दुष्परिणाम**

कोणतीही गोष्ट मर्यादेबाहेर गेली की तिचे रूपांतर विषामध्ये होते. मोबाईलच्या बाबतीतही हेच घडत आहे. मुलांच्या हातात लहान वयात मोबाईल दिल्याने खालील समस्या उद्भवत आहेत:

**शारीरिक आरोग्यावर परिणाम:** मोबाईलच्या स्क्रीनकडे तासनतास पाहिल्यामुळे मुलांच्या डोळ्यांवर ताण येतो. लहान वयातच चष्मा लागण्याचे प्रमाण वाढले आहे. तसेच, एकाच जागी बसून राहिल्याने मुलांमध्ये लठ्ठपणा (Obesity) वाढतोय, ज्यामुळे भविष्यात मधुमेह आणि हृदयविकाराचा धोका निर्माण होऊ शकतो.

**मानसिक आणि वर्तणूक बदल:** मोबाईलवरील गेम्स आणि सोशल मीडियामुळे मुलांमध्ये संयम कमी होत आहे. त्यांना प्रत्येक गोष्ट 'इन्स्टंट' हवी असते. जर मोबाईल काढून घेतला, तर मुले चिडचिड करतात, आरडाओरडा करतात किंवा हिंसक होतात. यालाच 'स्क्रीन ॲडिक्शन' असे म्हणतात.

**सामाजिक कौशल्यांचा अभाव:**

पूर्वी मुले मैदानात खेळायची, एकमेकांशी संवाद साधायची. आता मात्र चार मुले एकत्र बसली तरी प्रत्येकाच्या हातात मोबाईल असतो. यामुळे मुलांमधील संवाद कौशल्ये (Communication Skiòs) आणि सामाजिक जाणीव कमी होत चालली आहे.

**'ब्लू लाईट' आणि झोपेच्या समस्या**

मोबाईल स्क्रीनमधून बाहेर पडणारा 'निळा प्रकाश' (Bl} Light) शरीरातील 'मेलाटोनिन' या संप्रेरकावर परिणाम करतो, जे झोपेसाठी आवश्यक असते. रात्री उशिरापर्यंत मोबाईल पाहिल्यामुळे मुलांची झोप पूर्ण होत नाही, ज्याचा थेट परिणाम त्यांच्या अभ्यासातील एकाग्रतेवर होतो.

**पालकांची भूमिका आणि जबाबदारी**

मुलांच्या हातात मोबाईल असणे पूर्णपणे चुकीचे नाही, पण तो कधी, का आणि किती वेळ द्यावा, याचे नियंत्रण पालकांकडे असायला हवे.

**उदाहरणातून शिक्षण:** जर पालक स्वतः चोवीस तास मोबाईलमध्ये व्यस्त असतील, तर मुले त्यांचेच अनुकरण करणार. त्यामुळे पालकांनी मुलांसमोर मोबाईलचा वापर मर्यादित ठेवावा.

**स्क्रीन टाइम निश्चित करा:** दिवसातून अर्धा ते एक तास यापेक्षा जास्त वेळ मुलांना मोबाईल देऊ नये. अभ्यासासाठी वापर होत असेल तर त्यावर लक्ष ठेवावे.

**पर्याय उपलब्ध करून द्या:** मुलांना मैदानी खेळ, अवांतर वाचन, चित्रकला किंवा संगीताची ओढ लावा. जेव्हा त्यांना मोबाईलपेक्षा जास्त आनंद इतर कामात मिळेल, तेव्हा ते स्वतःहून मोबाईल सोडतील.

**पॅरेंटल कंट्रोल:** मोबाईलमध्ये कोणते घटक पाहावेत आणि कोणते टाळावेत, यासाठी 'पॅरेंटल लॉक'चा वापर करावा.

**वयोगटानुसार वापर**

तज्ज्ञांच्या मते, दोन वर्षांखालील मुलांना मोबाईलपासून पूर्णपणे लांब ठेवावे. ५ ते १० वयोगटातील मुलांना केवळ शैक्षणिक गरजांसाठी आणि पालकांच्या देखरेखीखाली मोबाईल द्यावा. किशोरवयीन मुलांना मोबाईल देताना त्यांना सायबर सुरक्षेबद्दल (Cyber Security) कल्पना देणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष**

मोबाईल हे दुधारी शस्त्र आहे. जर त्याचा वापर योग्य कारणासाठी आणि ठराविक मर्यादेत केला, तर ते प्रगतीचे साधन ठरेल. परंतु, जर तो मुलांच्या आयुष्याचा ताबा घेऊ लागला, तर ते त्यांच्या भविष्यासाठी घातक ठरेल.

शेवटी, मुलांच्या हातातील मोबाईलपेक्षा पालकांचा त्यांना मिळणारा वेळ अधिक महत्त्वाचा आहे. मुलांशी संवाद साधा, त्यांच्यासोबत खेळा आणि त्यांना निसर्गाच्या जवळ न्या. मोबाईल हे जग पाहण्याचे साधन असू शकते, पण तेच 'संपूर्ण जग' असू शकत नाही, ही जाणीव मुलांना करून देणे हीच आजच्या काळाची गरज आहे.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर ८३९०६७०९९९ या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.
त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला

रविवार, दि. १२ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## महिला व बाल विकास विभागात भरणार ८ हजारांवर पदे

**अकोला:** महिला व बाल विकास विभागात तब्बल २३ वर्षांनंतर ८ हजार ६६९ नियमित पदे भरण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे विभागाच्या सक्षमीकरणाला मोठी चालना मिळणार असून, महिला व बालकांसाठीच्या योजनांना गती मिळणार असल्याचा विश्वास महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केला आहे. विभागातील एकूण पदांचा आढावा घेण्यात आला. त्यापैकी काही पदे निरसित (रद्द) करून १६५ नव्या पदांची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे विभागासाठी एकूण ८ हजार ६६९ नियमित पदे मंजूर करण्यात आली आहेत. याशिवाय, विभागाच्या कामकाजासाठी २ हजार ८४३ पदे बाह्ययंत्रणेमार्फत भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. एकात्मिक बाल विकास सेवा (घ्ण्अ्) योजनेअंतर्गत १ लाख १० हजार ६६४ अंगणवाडी सेविका व १,१०,६६४ अंगणवाडी मदतनीस, अशी एकूण २ लाख २१ हजार ३२८ मानधनाधारित पदे देखील मंजूर करण्यात आली आहेत.

## बक्षीसाने विद्यार्थ्यांना नवी झेप

**अकोला :** बक्षीस हे केवळ सन्मान नसून विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांवर उमटलेली कौतुकाची शिक्कामोर्तब असते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्ती वाढून विविध कौशल्यांचा विकास होतो,ङ्क असे प्रतिपादन प्रा. वासुदेव डांगे यांनी केले.

सानवी ट्यूटोरियल, शिवर यांच्या वतीने आयोजित विद्यार्थी गुणगौरव सोहळा व करिअर मार्गदर्शन कार्यक्रमात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाची अध्यक्षता पोलीस उपनिरीक्षक दयाराम राठोड यांनी केली. कार्यक्रमाच्या व्यासपीठावर गणेश कांदे, प्रा. संगीता फाले, रुपेश फाले आदी मान्यवर उपस्थित होते. माता सरस्वती व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविकात प्रा. संगीता फाले यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांच्या यशाचा अभिमान व्यक्त केला. यावेळी नॅशनल लेव्हल अबॅकस स्पर्धेत चमक दाखवणाऱ्या भाग्यश्री जाधव, विराट निखाडे, हर्षल बारड, आरोही जाधव, सानवी फाले यांचा गौरव करण्यात आला.

## १८ तास विद्यार्थी देणार महामानवास वाचनातून सामूहिक अभिवादन

**अकोला:** भारतीय बौध्द महासभाच्या वतीने महात्मा ज्योतीराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती भव्य प्रमाणात अशोक वाटीका अकोला येथे आयोजित करण्यात आली असून यात अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात आले असल्याची माहिती अशोक वाटिका येथे संपन्न पत्रकार परिषदेत देण्यात आली.महासभेचे अध्यक्ष पी.जे. वानखडे,विजय जाधव व अन्य पदाधिकारी यांच्या उपस्थितीत आज दि.११ एप्रिल रोजी महात्मा ज्योतीराव फुले जयंती निमित्त सायंकाळी ६ वाजता अभिवादन व आयु. इंदुताई मेश्राम यांचे व्याख्यान होईल. दि. १२ एप्रिल रोजी महामानव बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत शेकडो विद्यार्थी हे वाचनातून अभिवादन करण्यात येणार आहे.

## निधन वार्ता

### सुमन कुकुलवार



**अकोला:** जठारपेठ स्थित केला प्लॉट येथील रहिवासी सुमन नारायण कुकुलवार ह्याचे आज पहाटे वृध्दापकाळाने निधन झाले आहे. त्यांच्यावर आज दूपारी उमरी हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलं सुभाष,अरुण,अनिल आणि राम कुकुलवार यांच्यासह सुना, नातवंड असा मोठा परिवार आहे.

# कावसा येथे अवैध दारूविक्री व जुगाराविरोधात जनजागृती सभा

प्रतिनिधी १२ एप्रिल

**कुटासा:** कावसा व तरोडा परिसरात वाढत्या अवैध दारूविक्री व जुगाराच्या प्रकारांबाबत नागरिकांमध्ये तीव्र चिंता व्यक्त होत असताना व्यसनमुक्त, निरोगी व सुसंस्कृत समाज घडविण्याच्या उद्देशाने कावसा बुद्रुक येथे जनजागृती सभा जनता विद्यालयात झाली.

कावसा येथे आयोजित करण्यात आली होती. गावातील दारू बंद करण्याकरीता ग्रामरक्षक दल स्थापन करून गावातील महिलांना दारूबंदीचे अधिकार देऊन कावसा गाव दारू मुक्त करण्याचा निर्धार करण्याचे आवाहन अधीक्षक दारूबंदी सीमाताई झावरे यांनी केले.

पोलिस निरीक्षक प्रमोद कांबळे, ठाणेदार



गोपाल ढोले, समाजसेवक गजानन हरणे, पत्रकार कुशल भगत, संजय गावंडे, सरपंच शिवदास बुटे, उपसरपंच पांडुरंग वानखडे, तरोडाच्या सरपंच सुनीता दामोदर , समाजसेवक देवराव अहीर, समन्वय बुद्ध विहार महासंघ अध्यक्ष धम्मबोधी डोंगरे, माजी पोलीस उपनिरीक्षक मनोहर वानखडे, संतोष भटकर निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क अकोट, राजेश राठोड, उपनिरीक्षक राज्य उत्पादन शुल्क अकोला,महेंद्र सोनार, उपनिरीक्षक राज्य उत्पादन शुल्क अकोला, श्रीमती वैशाली धुरंदर उपनिरीक्षक राज्य उत्पादन शुल्क अकोला अकोट, गजानन कदम, हरिभाऊ लोणकर , पीएसआय सोपान डाबेराव, पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रमोद लांडगे,पोलीस पाटील निळकंठ सावरकर, विठ्ठल तळी तंटामुक्ती अध्यक्ष, माजी सरपंच माधुरीताई वानखडे, तलाठी शितल कोकदे,आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

अवैध दारूविक्री व जुगार अड्डे रोखण्यासाठी कायदेशीर उपाययोजना, तक्रार प्रक्रिया, तसेच ग्रामस्तरावर जनजागृती वाढविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. युवकांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी सामाजिक उपक्रम राबविणे, कुटुंबव्यवस्था मजबूत करणे व शिक्षणाबरोबरच नैतिक मूल्यांची जपणूक करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

यावेळी उपस्थित नागरिकांनी व्यसनमुक्त समाज निर्मितीसाठी सामूहिक प्रयत्न करण्याचा संकल्प केला. .कार्यक्रमाचे संचालन पत्रकार सोनू जाधव यांनी तर आभार प्रदर्शन मा.पो.निरीक्षक मनोहर वानखडे यांनी तर प्रास्ताविक समाजसेवक हरणे यांनी केले.

## जि.प. मराठी कन्या शाळेत महात्मा ज्योतीबा फुले जयंती साजरी

प्रतिनिधी १२ एप्रिल

**हिवरखेड:** येथे विविध ठिकाणी महात्मा ज्योतीबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. संध्याकाळी माळी वैभव मंगल कार्यालय खारोन पुरा, दईबुवा संस्थान,स्वस्तिक कॉलनी येथून शोभायात्रा काढण्यात आली.

महात्मा ज्योतीबा फुले उत्सव समितीच्या वतीने विविध कार्यक्रम पार पडले. तसेच गावातील जिप



मराठी कन्या शाळा, नगरपरिषद, पोलिस स्टेशन, विविध शाळा कॉलेज, शासकीय स्थळी क्रांतिसूर्य जोतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. गावात उत्साही वातावरण होते.

## रूईखेड येथे महात्मा जोतिबा फुले जयंती साजरी

वि. प्रतिनिधी १२ एप्रिल

**अकोट :** रूईखेड येथील श्री बागाजी विद्यालय व श्रीराम कनिष्ठ महाविद्यालयात महान समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले यांची जयंती विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात ज्येष्ठ सेवाशिक्षिका अनिता मानकर यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी महात्मा फुले यांच्या जीवनकार्यावर प्रकाश



टाकत त्यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल मांडवे सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन अनिल ओखारे सर यांनी मानले. कार्यक्रमाला मुख्याध्यापक निनाद मानकर यांच्यासह किरण मानकर, अनिता मानकर, संतोष काळे, वनिता सरोदे, विशाल मांडवे, मंजुषा साठे, अनिल ओखारे, प्रा. रुपेश गायगोले, प्रा. रुपेश खंडारे, तसेच शिक्षकेतर कर्मचारी विठ्ठल फाळके, गजानन घुगे, अविनाश सुकोसे, संगिता नाठे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन केले.

## महाराजस्व अभियान समाधान शिबीर



**हातरुण:** महसुल विभागाकरिता शासनाने ४८ निर्णय घेतले असून सर्व योजना या शेतकरी व गरीब कुटुंबापर्यंत घरपोच पहोचविण्याचा मानस आहे. अभियान समाधान शिविर टप्पा क्रमांक १ अंतर्गत बाळापूर तालुक्यातील शिबिर १० रोजी येथील जिल्हा परिषद उर्दू शाळा येथे उत्साहाने पार पडले.

शिबिराला नायब तहसीलदार व मंडळ अधिकारी अंजली घाटे, तलाठी अजय भटकर तसेच हातरूण मंडळ मधील सर्व ग्राम महसूल अधिकारी व महसुल सेवक, ग्राम विकास अधिकारी कापकर, सरपंच पती सैय्यद काझीम अली, उपसरपंच पती भास्कर डोंगरे व शेख युसुफ उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी नगरात महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्साहात साजरी

प्रतिनिधी १२ एप्रिल

**अडगाव :** छत्रपती शिवाजी नगर येथे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सर्व प्रथम क्रांती सुर्य महात्मा ज्योतीबा फुले यांचे नविन स्मारकाचे उदघाटन मा. जि. प.अध्यक्षा सौ.संगिताताई नंदकिशोर अढाऊ ह्यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच तदनंतर क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या पुतळ्याचे हार व फुले वाहुण पुजन करण्यात आले. यावेळी गावातील सर्व प्रतीष्ठित मान्यव उपस्थित मा. जि. प.अध्यक्षा सौ. संगिताताई अढाऊ, मा.जि.प.सदस्या सौ. प्रमोदीनीताई



कोल्हे, मा.सरपंच सौ. गायत्री चिम, मा. जि.प.सदस्य डॉ.मनमोहनजी व्यास, मा.जि. प. सदस्य गोपालजी कोल्हे, मा. सरपंच युसुफभाई, असलमभाई, पत्रकार अशोक घाटे, पत्रकार मानिक घाटे, सर्व क्रांतीसुर्य प्रतीष्ठानचे अध्यक्ष नितीन निमकडे उपाध्यक्ष गजानन राखोडे व पदाधिकारी व गावकरी मंडळी उपस्थितीत छत्रपती शिवाजी नगर येथुन मिरवणुकीला सुरुवात करण्यात आली. यावेळी सर्व गावातील मिरवणुक मार्गावरुण फुलांचा वर्षाव करण्यात आला होता. तसेच मुख्यमार्गावरुण मिरवणुक मोठ्या आनंदाता पार पडली. या वेळी हिवखेडचे थानेदार राठोड एस.डि.पी.ओ.यांच्या मार्गदर्शनात पोलीस बंदोबस्त चोख ठेवण्यात आला होता.

## जैन साध्वी प्रभा प्रकाश कॉन्व्हेंटमध्ये 'विश्व नवकार महामंत्र दिवस' उत्साहात साजरा



**आलेगाव :** येथील जैन साध्वी प्रभा प्रकाश कॉन्व्हेंटमध्ये 'विश्व नवकार महामंत्र दिवस' मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला शाळेचे आधारस्तंभ व प्रेरणास्थान श्री सुभाषजी जैन, सौ. शकुंतलाजी जैन आणि शाळेचे अध्यक्ष श्री अक्षयजी जैन यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक नवकार महामंत्राच्या जपाने करण्यात आली. यावेळी सुभाष जैन यांनी महामंत्राचे महत्त्व विशद करताना सांगितले की, 'नवकार मंत्रात कोणत्याही एका विशिष्ट व्यक्तीचा उल्लेख नसून, हा मंत्र या जगातील सर्व महापुरुषांना वंदन करणारा एक वैश्विक नमस्कार मंत्र आहे.' शाळेचे अध्यक्ष अक्षय जैन यांनी आजच्या युद्धाच्या आणि अशांततेच्या वातावरणावर भाष्य केले. या प्रसंगी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना जैन समाजातील मयूर भांसली यांच्या वतीने बिस्कीट वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या वतीने कु. स्वराली ढोणे हिने मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुपाजी अंभोरे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार मुख्याध्यापक महावीर जैन यांनी मानले.

## महात्मा ज्योतीबा फुले जयंती निमित्त शोभायात्रा

**हिवरखेड:** येथे क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले उत्सव समितीच्या वतीने भव्य जल्लोषात महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा करून शोभायात्रा काढण्यात आली.

या शोभायात्रेतील फुले, शाहू प्रेमींना स्थानिक विकास मैदानात लिंबू सरबत वितरीत करण्यात आले, सावता परिषद संघटनाच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला, या सावता परिषदचे कल्याण आखाडे, लक्ष्मण निखाडे, यांच्या मार्गदर्शनात हिवरखेडचे रोहन झगळे, आकाश मानकर, कुशल वानखडे, श्याम ओंकारे, दर्शन खिरोडकार, सुपेश शेगोकार, रोहित इंगळे, वेदांत बाजारे, बेलूरकार, गौरव



ओंकारे, दीपक झगडे, अजय मानकर, विठ्ठल भाकरे, उमेश जयस्वाल, सुनील ओंकारे, अनुज मानकर, प्रफुल कवळकार यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले तसेच शोभायात्रेत फुले शाहू प्रेमीचां चागलाच उत्साह दिसून आला.

## अनोखळी मृतदेहाचा सन्मानाने अंत्यविधी

**अकोट:** अकोट बसस्थानक परिसरात एका इसमाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी दुपारी उघडकीस आली. अकोट शहर पोलिसांना एक व्यक्ती बसस्थानकाच्या आवारात बेशुद्ध अवस्थेत पडलेली असल्याची माहिती मिळाल्यानंतर तत्काळ त्याला अकोट ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्यांना मृत्यू घोषित केले.पोलिसांनी केलेल्या चौकशीत मृत व्यक्तीची ओळख अकोला येथील तापडिया नगरातील रहिवासी मनोज तुकाराम गर्ग (वय ४५) अशी पटली. मात्र त्याचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, याबाबत स्पष्ट माहिती अद्याप समोर



आलेली नाही.दरम्यान या घटनेनंतर माणुसकीचे एक प्रेरणादायी उदाहरण समोर आले. मानवता बहुउद्देशीय संस्था आणि अंत्यविधी सेवा समितीच्या वतीने मृतदेहाचे शवविच्छेदन करून नातेवाईकांच्या उपस्थितीत सन्मानपूर्वक अंत्यविधी पार पाडण्यात आला.आजच्या काळात अनेकदा बेवारस मृतदेहांकडे दुर्लक्ष केले जाते.मात्र अशा परिस्थितीत या संस्थांनी पुढाकार घेत मानवतेची खरी ओळख जपली आहे.त्यांच्या या कार्यामुळे समाजात सकारात्मक संदेश पसरत असून नागरिकांकडूनही कौतुक व्यक्त केले जात आहे.ही घटना केवळ एक अपघात किंवा मृत्यू नसून,संकटाच्या वेळी उभ्या राहणाऱ्या माणुसकीची जाणीव करून देणारी आहे.अकोटमध्ये घडलेले हे उदाहरण समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून अशा सेवाभावी कार्याला अधिक प्रोत्साहन मिळण्याची गरज व्यक्त होत आहे.

## मेघा इंजिनियरिंग कंपनी च्या सौर ऊर्जा प्रकल्पाला शेतकऱ्यांचा विरोध

प्रतिनिधी १२ एप्रिल

**अडगांव बु.:** मुख्यमंत्री सौर ऊर्जा योजनेला नाव मुख्यमंत्री यांचे आहे. परंतु मेघा इंजिनियरिंग खासगी कंपनी आहे. या कंपनीला शेतशिवार गट क्र. २४५ मध्ये होणाऱ्या सौर प्रकल्पाला स्थानिक शेतकऱ्याचा विरोध आहे.ही जमीन इ क्लास असल्याने कमी किंमतीत मेघा इंजिनियरिंगला देण्यात आली. या कंपनीच्या विरोधात जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले.

या भागात पाण्याची पातळी खूप खाली गेली असून कोरडा भाग आहे.या भागातील पाण्याची पातळी वाढावी म्हणून जलसंधारण अंतर्गत तीन मोठ्या तलावाची निर्मिती केली होती.



मेघा इंजिनियरिंग च्या कर्मचा-यांनी भूखंड ताब्यात येताच तलावातील पाणी बंद केले. एक तलाव पूर्ण बुजला तर उर्वरित दोन तलावाच्या भिंती खचवून त्यावर सौर प्यानल उभारण्यात येत असून तलाव बुजवत आहेत. याकडे शासकीय अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत.ठपाणी अडवा पाणी जिरवाठ असे शासनाचे उद्देश असून तलावांची निर्मिती वर सरकार चा भर आहे. तसेच सर्व झाडे प्रकल्प बनवताना तोडण्यात आलेली आहे. शेतकऱ्यांचे वहिवटीचे शेतरस्ते मोकळे करून घ्यावे,पाण्याचे तलाव पूर्ववत करून घ्यावे. झालेली नुकसानभरपाई मेघा इंजिनियरिंग कडून घेण्यात यावी असं न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी संघटनेचे विदर्भ अध्यक्ष लक्ष्मीकांत कौठकर यांनी दिला आहे.

## बी. चंद्रकांत रेड्डी अपर पोलीस अधीक्षक यांचे चांन्नी पोलीस स्टेशन येथे वार्षिक निरिक्षण

**पातूर :** पोलीस स्टेशन चान्नी येथे दि.०७ एप्रिल २०२६ रोजी अकोला जिल्ह्याचे अपर पोलीस अधीक्षक श्री. चंद्रकांत रेड्डी यांनी वार्षिक निरीक्षणासाठी भेट दिली.

यावेळी सर्वप्रथम पोलीस स्टेशन परिसरातील पोलीस पाटील यांची बैठक घेण्यात आली.या बैठकीत परिसरातील गुन्हेगारीचा आढावा घेण्यात आला तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीवर नियंत्रण कसे आणता येईल,गुन्हा घडताच त्यावर तत्काळ व योग्य उपाययोजना कशा कराव्यात आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित कशी ठेवावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यानंतर पोलीस अधिकारी व अंमलदारांसाठी कायदा व सुव्यवस्था संदर्भात पोलीस कवायत,शस्त्र कवायत तसेच मोब लॉन्चिंग संदर्भातील सराव घेण्यात आला.पोलीस स्टेशनमध्ये येणाऱ्या सामान्य नागरिकांना कायदा व सुव्यवस्था विषयक माहिती देऊन निर्भयपणे जीवन जगण्यासाठी आवश्यक बाबींवरही बी.चंद्रकांत रेड्डी यांनी मार्गदर्शन केले.तसेच नागरिकांच्या प्रलंबित तक्रारी व गुन्हे समजून घेऊन त्या तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना देण्यात आल्या.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६

**माँ. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय**

गायत्री नगर. अकोला

आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!

वैशिष्ट्ये :
- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा

इयत्ता १ ली ते १० वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
- इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार



मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय

मो. ९९२११८६७१५, ९५११२५४९५९, ९४२१८९५७९०, ९९६०४३७३६६

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. १२ एप्रिल २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# मुधापूर घाटावर रात्रीचाच 'धंदा'; वर्धा नदीपात्रातून रेती उपसा

प्रतिनिधी १२ एप्रिल



**यवतमाळ** : राळेगाव तालुक्यातील मुधापूर वाळू घाटावर अवैध वाळू उपशाचा प्रकार पुन्हा एकदा समोर आला आहे. रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात वाळू उपसा सुरू असल्याचे निदर्शनास येत आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, नियम धाब्यावर बसवून ट्रक-टिप्परच्या माध्यमातून वाळूची वाहतूक केली जात आहे. सूर्यास्तानंतर वाळू उपशास बंदी असतानाही घाट परिसरात रात्री उशिरापर्यंत हालचाल सुरू असल्याचे सांगितले जाते. नदीपात्रात यांत्रिक साधनांचा वापर करून वाळू काढली जात असल्याचेही काही नागरिकांनी नमूद केले आहे. यामुळे नदीच्या पर्यावरणावर परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.

मुधापूर घाटाचा लिलावही वादग्रस्त ठरत आहे. स्थानिकांच्या आरोपानुसार, अपेक्षित महसुलाच्या तुलनेत कमी दरात घाटाचा लिलाव करण्यात आला. या प्रक्रियेची चौकशी करून फेरलिलाव करावा, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, उपसा झालेली वाळू इतर भागात नेली जात असल्याचेही समोर येत आहे. काही ठिकाणी ओव्हरलोड वाहतुकीमुळे रस्त्यांची हानी होत असल्याची तक्रार आहे. संबंधित विभागांकडून मात्र याबाबत अधिकृत प्रतिक्रिया मिळू शकलेली नाही.

घटनेची माहिती देऊनही तातडीने कारवाई झालेली नसल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित होत असून, संबंधित यंत्रणांनी याकडे लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## घरात घुसून महिलेचा विनयभंग!

प्रतिनिधी १२ एप्रिल

**उमरखेड** : शहरातील एका महिलेच्या घरात घुसून तिचा विनयभंग केल्याची आणि तिच्या पती व सासऱ्यास मारहाण केल्याची घटना दि 10 एप्रिल रोजी रात्री 11.30 वाजता च्या दरम्यान घडली आहे. या प्रकरणी दोन आरोपींविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला आपल्या पती व सासऱ्यासह घरात झोपलेली असताना अचानक दरवाज्यावर जोरात आवाज झाला. दरवाजा उघडताच आरोपी गजानन अशोक डहाळे (वय २४) व अथर्व विजय माळवे (वय २४, दोन्ही रा, उमरखेड हे जबरदस्तीने घरात घुसले.

यावेळी आरोपी अथर्व माळवे याने फिर्यादीचा हात धरून तिला जवळ ओढत तिचा विनयभंग केला. महिलेला त्याच्या तावडीतून सोडवण्यासाठी तिचे पती व सासरे पुढे आले असता, दोन्ही आरोपींनी त्यांना धक्काबुक्की करून मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार पिडीतेने उमरखेड पोलीस ठाण्यात दिली या स्वरुपाच्या तक्रारीवरून पो स्टे ला गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार प्रकाश बोंबले हे करीत आहे.

# सावरगड कचरा डेपोतील आग नियंत्रणात; धग कायम



प्रतिनिधी १२ एप्रिल

**यवतमाळ** : शहरातील घरगुती व व्यावसायिक कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येणाऱ्या सावरगड येथील घनकचरा प्रक्रिया केंद्रात लागलेली आग नियंत्रणात आणण्यात अग्निशमन दलाला यश आले असले, तरी परिसरात आगीची धग अद्याप कायम आहे.

दि. 10 एप्रिल रोजी सकाळी सुमारे 9.30 वाजताच्या सुमारास प्रक्रिया केंद्रालगतच्या शेतात कचऱ्यास आग लावण्यात आली. मोकळा परिसर व वाऱ्याचा वेग यामुळे ही आग वेगाने पसरत जाऊन कचरा डेपोपर्यंत पोहोचली आणि तेथील साचलेल्या कचऱ्याला आग लागली.

### चार पालिकेचे अग्निशमन दल कार्यरत



घटनेची माहिती मिळताच यवतमाळ नगर परिषदेच्या अग्निशमन विभागाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. आगीची तीव्रता लक्षात घेता राळेगाव, घाटंजी व कळंब नगर परिषदांच्या अग्निशमन दलांची मदत घेण्यात आली.

एकूण चार पालिकांचे अग्निशमन बंब घटनास्थळी दाखल झाले होते. सर्व पथकांनी समन्वयाने कार्य करत आग आटोक्यात आणली. जेटिंग मशीन व जेसीबीच्या सहाय्यानेही आग विझवण्यास मदत झाली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, आगीच्या तीव्रतेमुळे काही फिरती शौचालये तसेच कचरा प्रक्रिया यंत्रणेचे किरकोळ नुकसान झाले आहे. नुकसानीचा पंचनामा सुरू असून पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

दरम्यान, आग नियंत्रणात आली असली तरी कचऱ्यातील उष्णतेमुळे धग कायम आहे. त्यामुळे अग्निशमन दलाकडून परिसरावर सतत लक्ष ठेवण्यात येत आहे. नागरिकांनी उघड्यावर कचरा जाळताना विशेष दक्षता घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# बाजार समितीच्या उत्पन्नवाढीसाठी विकास कामांची धडाडी

प्रतिनिधी १२ एप्रिल




**उमरखेड** : कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उत्पन्नात वाढ व्हावी तसेच पायाभूत सुविधा अधिक मजबूत व्हाव्यात या उद्देशाने विविध विकास कामांना गती देण्यात येत आहे. याच अनुषंगाने ढाणकी रोडवरील गुरांच्या उपबाजार परिसरात नवीन दुकान गाळे बांधकामाचे भूमिपूजन सोमवारी दि. 13 एप्रिल रोजी सकाळी 9.30 वाजता मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. उमरखेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती कृष्णा पाटील देवसरकर यांच्या नेतृत्वाखालील संचालक मंडळाने संस्थेच्या उत्पन्नवाढीसाठी नियोजनबद्ध पद्धतीने पावले उचलली आहेत. त्याचाच एक भाग म्हणून गुरांचा उपबाजार परिसरात नवीन दुकान गाळे उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

या भूमिपूजन कार्यक्रमास परिसरातील शेतकरी, व्यापारी तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सभापती कृष्णा पाटील देवसरकर, उपसभापती श्रीपाल आडे, बांधकाम समिती प्रमुख भिमराव पाटील चंद्रवंशी, सचिव संदिप जाधव तसेच संचालक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# पालकमंत्री संजय राठोड यांची अशीही संवेदनशीलता

प्रतिनिधी १२ एप्रिल

### अपघातग्रस्त दाम्पत्यास मदतीचा हात

**यवतमाळ** : नेत्यांचा ताफा रस्त्याने कायम भरधाव जाणार हे गृहीत असते. मात्र संवेदना जपत प्रवास करणारे राजकीय नेते लाभले तर सर्वसामान्यांच्या सुख, दु:खात रात्री, अपरात्री ते धावून जातात. याचाच प्रत्यय शुक्रवारी रात्री यवतमाळ-अमरावती मार्गावर पालकमंत्री संजय राठोड यांच्या मदतीमुळे एका अपघातग्रस्त दाम्पत्यास आला.

राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड हे शुक्रवारी रात्री नेर येथून आपल्या ताफ्याने यवतमाळकडे येत होते.

सोनखास ते लासीना दरम्यान दुचाकीस्वार दाम्पत्यास अज्ञात वाहनाने धडक दिली होती. हे दाम्पत्य रस्त्याच्या कडेने जखमी अवस्थेत विव्हळत पडून होते. त्याचवेळी पालकमंत्री संजय राठोड यांचा ताफा रस्त्यावरून जात होता. अपघाताचे हे दृश्य बघताच मंत्री संजय राठोड यांनी आपला ताफा थांबविला. त्यांनी तत्काळ त्यांच्या ताफ्यातील पोलीस वाहनातून या दाम्पत्यास शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात नेण्याच्या सूचना केल्या. यवतमाळ येथे वैद्यकीय महाविद्यालयात आपल्या कार्यकर्त्यांना सूचना देवून डॉक्टरांशीही चर्चा केली. यावेळी पालकमंत्री संजय राठोड यांनी जखमींची आस्थेने विचारपूस केली. त्याच दरम्यान रूग्णवाहिका अपघातस्थळी पोहोचली. या जखमी व्यक्तींना तातडीने रूग्णवाहिकेतून यवतमाळकडे रवाना करण्यात आले. मंत्री संजय राठोड यांनी आपल्या ताफ्यातील पोलिसांचे सुरक्षा वाहन या रूग्णवाहिकेसोबत देवून जखमींवर उपचार होईपर्यंत दवाखान्यात थांबण्याच्या सूचना कर्मचाऱ्यांना



केल्या. पालकमंत्री संजय राठोड यांच्या या संवेदनशील कृतीने दोन जखमी व्यक्तींना वेळीच उपचार मिळून त्यांना जीवदान मिळाले. यावेळी उपस्थित गावकरी आणि रस्त्याने जाणाऱ्या वाहनधारकांनी पालकमंत्री संजय राठोड यांच्या कृतीबद्दल कौतुक करत धन्यवाद मानले.

# आर्णीत विविध सामाजिक उपक्रमांनी 'मेमन डे' साजरा



प्रतिनिधी १२ एप्रिल

**आर्णी** : दि. 11 एप्रिल हा दिवस जगभरात जागतिक 'मेमन डे' म्हणून विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा केला जातो. आल इंडिया मेमन जमात फेडरेशन मुंबईचे राष्ट्रीय अध्यक्ष हाजी इकबाल ऑफिसर यांच्या नेतृत्वाखाली हा दिवस दरवर्षीप्रमाणे यंदाही सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्यात आला.

आर्णी शहरातील कच्ची मेमन समाजातर्फे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यात ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळवाटप, शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप तसेच नागपुरे वृद्धाश्रमात वृद्धांना वैद्यकीय साहित्य व फळवाटप करण्यात आले.या उपक्रमांमधून समाजातील विविध घटकांशी संवाद साधत परस्पर शुभेच्छा देत मेमन डे उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी जमात प्रमुख हाजी शफी खाकरा (राष्ट्रीय सदस्य), हाजी युसूफ नागानी, यासिन धारिवाला, हाजी रऊफ डोसानी, जमात सचिव इम्रान फाजलानी, शमी देलानी, आर्णी मेमन जमात अध्यक्ष यासिन नागानी, फारुक धारिवाला, हाजी रफिक राजकोटिया तसेच जमात उपाध्यक्ष कादर इसानी आदी उपस्थित होते.

# माळपठारावरील रस्त्यांची दुरावस्था

### काँग्रेसचा सार्वजनिक बांधकाम विभागाला अल्टिमेटम : कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी

प्रतिनिधी १२ एप्रिल



**पुसद** : पुसद तालुक्यातील कारला मार्गे शेंबाळपिंपरी रस्त्यासह माळपठार परिसरातील विविध रस्त्यांची दुरावस्था झाली असून रखडलेल्या व संथगतीने सुरू असलेल्या कामांमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर पुसद काँग्रेस पक्षाच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन देत तातडीने कामे पूर्ण करण्याचा अल्टिमेटम देण्यात आला आहे.

या मार्गावर शेतकरी, शेतमजूर, विद्यार्थी, गर्भवती महिला तसेच सर्वसामान्य नागरिकांची मोठी वर्दळ असते. मात्र रस्त्यांची अत्यंत वाईट अवस्था झाल्याने दैनंदिन प्रवास धोकादायक बनला आहे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. लोहरा फाटा ते सावरगाव रस्त्याचे काम अर्धवट अवस्थेत असून त्याची तातडीने दखल घेऊन पूर्णत्वास नेण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच देवठाणा फाटा ते माणिकडोह रस्त्याचे काम मागील दोन महिन्यांपासून संथगतीने सुरू असल्याने वळणांवर गिट्टी पसरल्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे, असेही सांगण्यात आले आहे. माणिकडोह गावातील मुख्य रस्ता मागील तीन महिन्यांपासून खोदून ठेवल्याने वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली असून एसटी बस व रुग्णवाहिका सेवाही प्रभावित झाल्याचे निवेदनात म्हटले आहे. यामुळे नागरिकांना अतिरिक्त आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. लाखी ते चिखली, पारवा ते पन्हाळा या रस्त्यांची अवस्थाही अत्यंत खराब असल्याने प्रवास "जीव मुठीत घेऊन" करावा लागत असल्याचे काँग्रेसने स्पष्ट केले आहे. सदर कामांची चौकशी करून संबंधित ठेकेदार व अभियंत्यांवर कारवाई करावी, तसेच रखडलेली कामे तातडीने पूर्ण करावीत; अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही पुसद काँग्रेसने दिला आहे.

या निवेदनावर तालुकाध्यक्ष विलास वाघमारे, शहराध्यक्ष झिया शेख, प्रदेश अल्पसंख्याक महासचिव सैय्यद इस्तियाक, कार्याध्यक्ष ज्ञानदीप कांबळे, नगरसेवक जब्बार लाखे, युवक जिल्हा सचिव सुजित मानकामे, सेवादल अध्यक्ष गोपाल राठोड, युवक उपाध्यक्ष शाहीद मिर्झा, सूरज धुळे, गजानन इंगोले, यश चव्हाण, सुमेध कुलदीपके आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# भवानी ग्राम विविध कार्यकारी संस्थेच्या अध्यक्षपदी माधवराव अकोलकर

प्रतिनिधी १२ एप्रिल

**उमरखेड** : भवानी ग्राम विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्यादित र.नं. 772 च्या संचालक मंडळाची निवड दि. 8 एप्रिल रोजी स्थानिक सहाय्यक दुय्यम निबंधक कार्यालयात पार पडली. या निवड प्रक्रियेत अध्यक्षपदी माधवराव अकोलकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी संजय पांडे यांची निवड झाली असून संचालक मंडळामध्ये संतोष कदम, सदानंद गावंडे, बाबुराव बेले, मारोतराव चंद्रे आणि सौ. आरती गावंडे यांची निवड करण्यात आली आहे. निवड प्रक्रिया अत्यंत शांत आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते, ग्रामपंचायत पदाधिकारी, शेतकरी व संस्थेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून एम. एस. चव्हाण, कदम तसेच संस्थेचे सचिव किशोर मनभे यांनी कामकाज पाहिले. संपूर्ण प्रक्रिया सुरळीत पार पडल्याची माहिती देण्यात आली.

**श्री.एस. आर. जैन, दिवाणी न्यायाधिश क. स्तर महागाव**
**ता. महागाव, जि. यवतमाळ यांचे न्यायालय**

**जाहीर नोटीस**

सिविल एम. ए. क्र. : १९/२०२६
पार्वताबाई नरवाडे अधिक २ -वि- कोणीही नाही.
ने.ता. २८/०४/२०२६

**आवेदक** :- **१. पार्वताबाई उकंडराव नरवाडे, वय अं. ७३ वर्षे,**
**२. संजय उकंडराव नरवाडे, वय अं. ५२ वर्षे,**
**३. सुरेखा सीताराम गावंडे, वय अं. ५० वर्ष,**
**क्र. १ व २ रा. महागाव, ता. महागाव, जि. यवतमाळ,**
**क्र. ३ रा. मालेगाव, ता. आर्णी, जि. यवतमाळ**
**...विरूध्द...**
**अनावेदक** :- **कोणीही नाहीं**

ज्याअर्थी सर्वत्र जनतेस या जाहीर नोटीसद्वारे सुचित करण्यात येते की, आवेदक क्र. १ ते ३ हे मयत उकंडराव मारोती नरवाडे यांचे वारस असुन मयत उकंडराव मारोती नरवाडे हे आवेदक क्र. १ चे पती व आवेदक क्र. २ व ३ चे वडील होते. उकंडराव मारोती नरवाडे यांचा मृत्यु दिनांक ०२/१२/२०२२ रोजी मौजा महागाव, ता. महागाव, जि. यवतमाळ येथे मृत्यु झाला आहे. आवेदकांना वारसा हक्क. प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता आवेदकांनी मुबई विनिमयाचे धारा ८ सन १८२७ चे नियम २ चे तरतुदी अनुसार आवेदक यांना वारसाचे प्रमाणपत्र मिळणेकरीता या न्यायालयाकडे दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १९/२०२६ नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व लोकांना या जाहीर नोटीस द्वारे सुचित करण्यात येते की, सदरह आवेदक क्र. १ ते ३ हे मयत उकंडराव मारोती नरवाडे यांचे वारस आहे किंवा नाही याबाबत कोणाचा कोणत्याही प्रकारचा आक्षेप अथवा हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रकाशित झाल्यापासुन ३० दिवसाचे आत आपला आक्षेप अथवा हरकत लेखी स्वरूपात नोंदवावा. तसे न केल्यास सदरचा अर्ज अर्जदाराचा पुरावा घेवुन निकाली काढण्यात येईल.

आज दि. १७/०२/२०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, क. स्तर महागाव**

# ऊस उत्पादकांचे 'डेक्कन'कडे ४० कोटी थकीत

प्रतिनिधी १२ एप्रिल

### शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ, पालकमंत्री संजय राठोड यांना निवेदन

**उमरखेड** : तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी २०२५-२६ हंगामात डेक्कन शुगर मांगरूळ कारखान्याकडे गाळपासाठी पाठवलेल्या उसाचे तब्बल ४० कोटी रुपयांचे बिल अद्यापही थकीत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. १ जानेवारीपासून आजपर्यंत एक रुपयाही खात्यात जमा न झाल्याने शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आल्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.

ऊस उत्पादकांनी लग्नकार्य, शेतीकामे, तसेच बँक व पतसंस्था कर्जाचे हप्ते भरण्यासाठी या पैशांवर अवलंबून राहिले असताना कारखान्याकडून पैसे न मिळाल्याने आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे. उमरखेड तालुक्यातील भैरवनाथ, डेक्कन, शिऊर, शुभाष हदगाव आदी कारखान्यांना ऊस गाळपासाठी दिला गेला असला तरी ऊस बिल प्रलंबित असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

या गंभीर प्रकरणाकडे जिल्ह्याचे पालकमंत्री ना. संजय राठोड यांनी तात्काळ लक्ष घालावे, अशी मागणी शिवसेना जिल्हा सहप्रमुख चिंतागराव कदम, रवि रुडे, मोहण नाईक यांनी



निवेदनाद्वारे केली आहे. हे निवेदन पालकमंत्र्यांना देऊन शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

> ■ राज्य सरकारने कर्जमाफी व प्रोत्साहन योजना जाहीर केल्या असल्या तरी ऊस बिल वेळेवर न मिळाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. मार्च अखेरपर्यंत सोसायटी कर्ज भरणेही कठीण झाले असून शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.
> - चिंतागराव कदम, शिवसेना सहसंपर्क प्रमुख, यवतमाळ

## ऑटो अपघातात युवक जागीच ठार

प्रतिनिधी १२ एप्रिल

**कळंब** : तालुक्यातील पिंपळखुटी येथे जात असताना ऑटो उलटल्याने भास्कर मेश्राम यांना गंभीर मार लागल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना शुक्रवार १० एप्रिल रोजी दुपारी २ वाजता घडली.

सरपधरी येथून ३ महिलांसह मेश्राम हे ऑटोने पिंपळखुटी येथे सोयरिक संबंधाने सरपधरी येथील कैलास पंधरे यांचा ऑटो क्रमांक एमएच ३२/ए-८९९८ ने जात असताना हा अपघात झाला. या अपघातात ऑटोतील दोन महिलांही जखमी झाल्या आहेत.

सिटी न्यूज अमरावती
रविवार, दि. १२ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## पदव्युत्तर प्राणिशास्त्र विभागातील विद्यार्थीनी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत

**अमरावती:** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील पदव्युत्तर प्राणिशास्त्र विभागातील कु. सिया विलास चव्हाण व कु. दिया विलास चव्हाण या जुळ्या भगिनींनी अनुक्रमे ८.८६ आणि ८.८० पॉईंट घेऊन विद्यापीठाच्या उन्हाळी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एस. एस्सी. भाग-२ प्राणिशास्त्र परीक्षेत उत्तीर्ण होऊन गुणवत्ता यादीत अनुक्रमे पाचव्या आणि सहाव्या क्रमांकाने येण्याचा मान मिळविला आहे. या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. हेमलता



नांदूरकर तसेच शिक्षक श्री विनोद नागले, डॉ. शितल काळे, डॉ. रजनी तायडे, अंकिता पानसरे, अर्पित इंगळे, संपदा जोशी, रचना धुरे, विनय झटाले यांनी अभिनंदन केले आहे. विद्यार्थिनी आपल्या यशाचे श्रेय आईवडील व शिक्षकवृंदांना देतात.

# समताधिष्ठित समाज घडविण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सत्यशोधक विचाराची गरज- आ. सुलभा खोडके

प्रतिनिधी १२ एप्रिल

### क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९९ व्या जयंती निमित्य मानवंदना व अभिवादन

अमरावती: सामाजिक क्रांतीचे अग्रदूत महात्मा ज्योतिबा फुले यांनी यांनी आपल्या सत्यशोधक विचारांनी समाजातील अनिष्ट प्रथा- रूढी परंपरेवर कडा प्रहार केला. अविद्या हे अधोगतीचे तर शिक्षण हे प्रगतीचे कारण असल्याने त्यांनी बहुजनांना शिक्षणासाठी प्रेरित केले. स्त्रियांना शिक्षित होण्याचे महत्व पटवून दिले. जाती भेदाच्या समुळ उच्चाटनासाठी त्यांनी प्रस्थापितांचे विरोध झुगारून सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी आजन्म लढा देऊन सामाजिक परिवर्तनाची क्रांती घडवून आणली. महात्मा ज्योतिबा फुले हे समतावादी विचारांचे खरे पुरस्कर्ते असून आज समताधिष्ठित समाज घडविण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सत्यशोधक विचारांची गरज असल्याचे प्रतिपादन आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी केले.



आज शनिवार दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी क्रांतीज्योती महात्मा ज्योतिबा फुले यांच्या १९९ व्या जयंती निमित्य आ.सौ. सुलभाताई खोडके व महाराष्ट्र विधान परिषद सदस्य संजय खोडके यांनी स्थानिक चित्रा चौक स्थित महात्मा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला हारार्पण करून मानवंदना व अभिवादन केले. तसेच महात्मा फुले उत्सव समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमाला उपस्थित राहून समस्त अनुयायांना जयंती दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी आपले विचार व्यक्त करतांना सांगितले कि, सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यात महात्मा फुले यांचे योगदान अमूल्य व अतुलनीय असून स्त्री शिक्षण व अस्पृश्यता निवारणासाठी त्यांचे कार्य महत्वपूर्ण आहे. महात्मा फुले यांचे समतावादी विचार, स्त्री -मुक्तीचे धोरण हे भारतीय संविधानातूनही प्रतिबिंबित होत असल्याने त्यांच्या पुरोगामी व विज्ञाननिष्ठ विचारातून समाजाला सदैव परिवर्तनाची नवी दिशा मिळणार असल्याचे सुद्धा आमदार सौ.सुलभाताई खोडके यांनी सांगितले.

तसेच आ.संजय खोडके यांनी आपल्या मनोगतातून सांगितले कि, पुढील वर्ष हे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीचे द्विशताब्दी वर्ष असल्याने महाराष्ट्र शासनाच्या वतीने आगामी काळात विविध शैक्षणिक, सामाजिक, उपक्रम तसेच विकासाच्या योजना राबविण्यात येणार असून अमरावती मध्ये सुद्धा पुरेपूर अंमलबजावणी साठी आपला प्रयत्न आहे. शासनाच्या महाज्योती संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षण, प्रशिक्षण, वसतीगृह, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन यासह अनेक उच्चशिक्षणाच्या संधींचा अमरावतीमध्ये उपलब्ध करण्याबाबत आपला पुढाकार राहणार असल्याचा विश्वास आ.संजय खोडके यांनी व्यक्त केला.

दरम्यान महात्मा फुले उत्सव समितीच्या वतीने आमदार महोदयांचा पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. दरम्यान इंजिनियर वासुदेव चौधरी यांनी साकारलेली महात्मा ज्योतिबा फुले यांची वेशभूषा लक्षवेधी ठरली होती. यावेळी मनपा नगरसेवक प्रमोद महल्ले, गुड्डू उर्फ प्रशांत धर्माळे, नगरसेविका ममता संदीप आवारे, अर्चना मनीष पाटील, वंदना मडघे, सुनीता भेले, दीपक उर्फ गजू लोखंडे, नानाभाऊ हाडोळे, नाना आमले, मनोज भेले, श्रीधर देशमुख, श्रीकांत नागरीकर, आकाश वाघमारे, रुपेश फसाटे, निलेश नागपुरे. बंडू कथिलकर, गणेश मानकर, भास्कर ढेवले, दिनेश भुसारी, मनोज अंबाडकर, सुयश श्रीखंडे, वासुदेव चौधरी, मनोहर वाठ, नारायण सांडे, दर्शन नागपुरे, शिरीष कुरळकर, शेखर मालपे, दत्तात्रय गणगणे, अशोक उमक, धर्मेंद्र यावले, विशाल डहाके, विलासराव उमक, तसेच सर्वसौ. छायाताई घाटोळे (मिश्रा), अपर्णा डाहाके, किरणताई मेहरे, मंगलाताई चांदुरकर, माया खरबडे, उज्वलाताई. लंगडे, लता चिंचोळकर, रजनी मामले, नंदा कांडलकर, निलांबरी हाडोळे, निलीमा काळे, ज्योती सांडे आदींसह अनुयायी व सहकारी प्रामुख्याने उपस्थित होते.


# संत कवरराम मार्केटमधील 'श्रीसंत पगडीवाला सेल्स' दुकानाला भीषण आग

प्रतिनिधी १२ एप्रिल

### अग्निशमन दलाच्या तत्परतेने २ कोटींचे नुकसान टळले

**अमरावती :** ११ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ०१.०८ वाजता दरम्यान संत कवरराम मार्केट येथील 'श्रीसंत पगडीवाला सेल्स' या दुकानाला अचानक आग लागल्याची घटना घडली. जोशी मार्केट समोर असलेल्या या दुकानातील आग दुसऱ्या मजल्यावर लागली होती. या घटनेची माहिती शहर वाहतूक शाखेच्या पोलीस इन्स्पेक्टर उईके मॅडम यांनी अग्निशमन मुख्यालय नियंत्रण कक्षाला फोनद्वारे दिली.

माहिती मिळताच अग्निशमन अधीक्षक अजय पंधरे व पाळी प्रमुख सुनील काकडे यांच्या आदेशानुसार फायर लॉरी क्रमांक Mh 27& BW 6913 तात्काळ



घटनास्थळी रवाना करण्यात आली. वाहन चालक गौरव फुके यांच्यासह फायरमन अमोल साळुंके, राजेश गजबे व इतर कर्मचाऱ्यांनी अवघ्या काही मिनिटांत घटनास्थळी पोहोचून बचावकार्य सुरू केले.

घटनास्थळी पोहोचल्यानंतर आग दुसऱ्या मजल्यावर असल्याचे निदर्शनास आले. दरवाजा बंद असल्यामुळे सुरुवातीला अडथळा निर्माण झाला, मात्र अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी तत्काळ दरवाजा तोडून आत प्रवेश करत आगीवर नियंत्रण मिळवण्यास सुरुवात केली. सुमारे ४५ मिनिटांच्या अथक प्रयत्नांनंतर आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवण्यात यश आले.

या घटनेत मालकाच्या माहितीनुसार सुमारे २० लाख रुपयांचे नुकसान झाले असून, अग्निशमन दलाच्या वेळीच केलेल्या कार्यवाहीमुळे अंदाजे २ कोटी रुपयांचे नुकसान टळले. दुकानातील कटलरी साहित्य, कापड, मशिनरी व फर्निचर यांचे मोठे नुकसान झाले. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी किंवा जखमीची घटना घडली नाही. या बचावकार्यात वाहतूक पोलीस इन्स्पेक्टर उईके मॅडम व त्यांच्या टीमचेही मोठे सहकार्य लाभले. तसेच अग्निशमन अधीक्षक अजय जी पंधरे यांनी स्वतः घटनास्थळी उपस्थित राहून परिस्थितीचा आढावा घेतला. या मोहिमेत अग्निशमन अधीक्षक अजय पंधरे, फायरमन राजेश गजबे, हर्षद दहातोंडे, निखिल बाटे, गोविंद घुले, अमोल साळुंके, रोशन अलुडे, निशांत राठोड, सागर माकोडे तसेच वाहन चालक गौरव फुके, कासम खान, नितीन इंगोले यांचा समावेश होता.

# भारत अमेरिका कराराचे विरोधात, किसान मजूर कामगारांचे आंदोलन

प्रतिनिधी १२ एप्रिल

### जिल्हाधिकारी कार्यालयावर १३ एप्रिल ला आयोजन

**अमरावती:** महाराष्ट्र राज्य किसान सभी A IKS' महाराष्ट्र राज्य लाल बावटा शेतमजूर युनियन BKMU ऑल इंडिया ट्रेड युनियन कॉंग्रेस AITUC यांचे संयुक्त पणे जिल्हाधिकारी कार्यालयावर धरणे आंदोलन आयोजित केले आहे. १३ एप्रिल ला सकाळी ११ वा. पासून ४वाजेपर्यंत सदर आंदोलन होईल.

भारत अमेरिका व्यापार करार, हा संविधान विरोधी, देशविरोधी व शेतकरी विरोधी आहे शेती व शेतकरी दोन्ही प्रचंड संकटात असताना त्याचा इलाज करणे ऐवजी त्याच्या संकटात अधिक वाढ करणारा सदर करार आहे. अमेरिकेसारख्या प्रगत देशातील शेतीक्षेत्र आणि भारतासारख्या विकसनशील देशातील शेतीक्षेत्र यामध्ये मोठे अंतर आहे .अमेरिकन शेतमाल भारतीय बाजारपेठेमध्ये सरळ आला तर भारतीय शेतीमालाचे भाव पडतीलच .यात शंका नाही यामुळे शेतकऱ्यांपुढील संकट अधिक गळद होणार म्हणून सदर करार सरकारने रद्द करावा

स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून भारतामध्ये कामगारांची आंदोलन होत आहेत. सततच्या संघर्षा मधून कामगार आंदोलनांनी जे मिळवलं, त्याचं कायद्यात रूपांतर झालं. हे सर्व कायदे संपवून केंद्र सरकारने केवळ चार श्रमसंहिता पुढे केल्या. आंदोलनाचा अधिकार संपवला, कामाचे आठ तास संपवले, पेन्शन संपविली, कामगार समुदायाला गुलामी मध्ये ढकललं. म्हणून चार श्रमसंहिता सरकारने मागे घ्याव्या.

तसेच शेतमजुराला वर्षातील ३६५ दिवसाची जिंदगी कशी जगावी. हा प्रश्न मजुरांसमोर उभा झाला तेव्हा मोठ्या लांब पल्ल्याच्या चळवळी झाल्यात. त्यातून मनरेगा कायदा जन्माला आला कामाच्या हमीचे तत्त्व जन्माला आले, किमान मजुरीचा कायदा जन्माला आला. या सगळ्यांना सोडून जी रामजी ही योजना सरकारने पुढे केली .यामध्ये द्वेषाचे राजकारण आहे.

म्हणून मनरेगा योजना जैसे थे लागू करण्यात यावी. शेतमजुराला कामाची हमी द्यावी.

आदी प्रमुख मागण्यांना घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयावर विशाल धरणे आंदोलनाचे आयोजन केले आहे. यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन भाई तुकाराम भस्मे, अशोक सोनारकर, सुनील मेटकर, संजय मंडवधरे, जे.एम कोठारी, चंद्रकांत बानू बाकोडे, सतीश चौधरी, डॉक्टर ओमप्रकाश कुटेमाटे, सुनील घटाळे, चंद्रकांत वडसकर, निळकंठ ढोके सागर दुर्योधन, जयेंद्र भोगे अर्चना भांडवलकर माया पिसाळकर प्रफुल्ल देशमुख पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय अमरावती येथे बाल रुग्णावर किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी

प्रतिनिधी १२ एप्रिल

### वडिलांनी दिले मुलाला जीवनदान

**अमरावती :** स्थानिक डॉ पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय अमरावती येथे आणखी एक किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण झाली. विशेष बाब म्हणजे अमरावती शहरात वयाच्या बारा वर्षाच्या बाल रुग्णावर होणारी ही पहिली शस्त्रक्रिया ठरलीङ. बारीपुरा जुनी वस्ती येथील मध्यमवर्गीय कुटुंबातील रहिवासी अनंता मधुकर लांडोरे यांचा मुलगा सिद्धेश अनंत लांडोरे याला जन्मजात एकच किडनी होती. परंतु सिद्धेश ची ती एक असलेली किडनी देखील बरोबर काम करत नसल्यामुळे त्याला दम लागणे, श्वास भरून येणे, ताप येणे, असे होत असल्यामुळे त्यांनी शहरातील सुप्रसिद्ध नेफ्रॉलॉजिस्ट डॉ अविनाश चौधरी यांच्याकडे उपचार घेणे सुरू केले. परंतु सिद्धेश ची तब्येत



रुग्ण :- सिद्धेश अनंता लांडोरे | डोनर :- अनंता मधुकर लांडोरे

खालावत असताना त्यांनी त्यांच्या कुटुंबाला किडनी प्रत्यारोपण हा यावरील उत्तम पर्याय असल्याचे सुचवले व त्यानुसार डॉ अविनाश चौधरी व ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेटर सतीश वडनेरकर यांनी अवघ्या तीन आठवड्यात संपूर्ण कागदपत्र, वैद्यकीय चाचण्या, कायदेशीर बाबींची पूर्तता, पोलीस वेरिफिकेशन करून संपूर्ण फाईल तयार करून प्राधिकरण समिती, आथोराझेशन कमिटी, समोर सादर करून मान्यता मिळविली.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री हर्षवर्धन देशमुख महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ अनिल देशमुख, वैद्यकीय अधीक्षक डॉ पवन टेकाडे, डॉ सोमेश्वर निर्मळ यांच्या मार्गदर्शनाखाली शस्त्रक्रियेचे नियोजन करण्यात आले .

"शस्त्रक्रिया दरम्यान शस्त्रक्रिया गृहात परिचारिका संध्या वाघमारे, प्रियंका मैद, सुमित्रा घाडगे, गंगा पाटील, मोहिनी गोहत्रे, राणी खेकडे, आशिष बोकडे, वैभव नासरे, प्रतीक्षा भिसेकर, अरविना जांभेकर, रोशन मेश्राम यांनी काम पाहिले .तर किडनी आयसीयू मध्ये पुढील दहा दिवस शितल अंबरते, दामिनी ढवळे, स्मिता वावरे, नेहा घोरपडे, शशिकांत ढिवर, काजल गुर्जर, श्वेता धांडे, जतिन दडमल, प्रतीक्षा दामोदर, मनीषा गद्रे रुद्रयानी खंडारे, ममता चव्हाण हे कार्यरत राहणार आहे.

ट्रान्सप्लांट कॉर्डिनेटर सतीश वडनेरकर, रुग्णालय व्यवस्थापक डॉ श्रीकांत फुटाणे, ऋग्वेद देशमुख, मॅट्रण चित्रा देशमुख, एम एस डब्ल्यू अनिकेत माहोरे, सहाय्यक आरती मोरांडे यांचे शस्त्रक्रिया पूर्वतयारीत व फाईल पूर्ण करण्यात मोलाचे सहकार्य होते. ही अत्यंत महागडी असलेली शस्त्रक्रिया शासनाच्या ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत संपूर्ण मोफत करण्यात आली. तसेच शस्त्रक्रिये पूर्वी देखील बऱ्याच चाचण्या रुग्णालयास्तरावरून मोफत करण्यात आल्यामुळे रुग्णाला बराच दिलासा मिळाला रुग्णाच्या कुटुंबीयांनी शस्त्रक्रिये बाबत समाधान व्यक्त केले आहे. गोपाल सावरकर, नवनीत करडे, उमेश सोनवणे, उमेश चव्हाण, मंगेश गुडदे, मधुर भुयार, निलेश धोगळे, उदय तेलखडे, रुपेश जामणीक, यांनी सहाय्यक म्हणून कर्तव्य पार पाडले.

# मान्सूनपूर्व देखभाल- दुरूस्तीच्या कामांची जिल्ह्यात सुरुवात

प्रतिनिधी १२ एप्रिल

**अमरावती:** पावसाळ्यात वादळी वारा, मुसळधार पाऊस आणि विजांच्या कडकडाटामुळे विद्युत पुरवठ्यात निर्माण होणारा व्यत्यय टाळण्यासाठी अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांच्या मार्गदर्शनात महावितरणच्या मान्सूनपूर्व देखभाल दुरूस्तीच्या कामांना जिल्ह्यात सुरुवात करण्यात आली आहे.



अचलपूर विभागात एक वितरण केंद्र – एक उच्च दाब विद्युत वाहिनीची दुरूस्तीङ यानुसार कामाचे नियोजन करण्यात आले आणि आज (दि. ११ एप्रिल) एकाच दिवसात अचलपुर विभागांतर्गत अचलपुर, अंजनगाव सुर्जी, दर्यापूर, चांदूर बाजार, चिखलदरा आणि धारणी या तालुक्यांतील प्रत्येक वितरण केंद्रामधील एक उच्च दाब वाहिनी याप्रमाणे ४० वितरण केंद्रातील ४० उच्चदाब वाहिन्यांची देखभाल दुरूस्ती करण्यात आली.

देखभाल दुरूस्तीच्या कामांतर्गत विद्युत वाहिनीजवळील धोकादायक झाडांच्या फांद्या छाटणे, नादुरुस्त जंपर्सची पुनर्जोडणी करणे, सैल तारा ताणून योग्य स्थितीत आणणे आदी महत्त्वाची कामे करण्यात आली. या कामासाठी कार्यकारी अभियंता प्रदिप अंधारे यांनी प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन सुरू असलेल्या कामांची पाहणी केली व आवश्यक सूचनाही दिल्या.

मान्सूनपूर्व देखभाल दुरूस्तीच्या कामामुळे पावसाळ्यातील संभाव्य विद्युत व्यत्यय कमी होऊन ग्राहकांना अधिक विश्वासार्ह व अखंड वीजपुरवठा मिळण्यास मदत होणार असल्याचे महावितरणने सांगितले आहे.

# अचलपूरमध्ये ३८ वी विदर्भ केसरी कुस्ती स्पर्धा; १५ संघांसह ३०० पैलवानांचा सहभाग

प्रतिनिधी १२ एप्रिल

**अमरावती :** अचलपूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष रुपाली अभय माथने यांच्या पुढाकाराने पालकमंत्री चषक व ३८ वी विदर्भ केसरी पुरुष व महिला कुस्ती स्पर्धा दिनांक १६, १७ व १८ एप्रिल २०२६ रोजी विठ्ठलवाडी मैदान, तहसील रोड, अचलपूर येथे भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आली आहे.

विदर्भ कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने श्री. हनुमान आखाडा वितनपुरा, अचलपूर नगरपरिषद व अमरावती शहर जिल्हा कुस्तीगीर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत अमरावती शहर, अमरावती जिल्हा, नागपूर शहर, नागपूर जिल्हा, अकोला शहर,



अकोला जिल्हा, चंद्रपूर शहर, चंद्रपूर जिल्हा, गर्गादिया जिल्हा, गडचिरोली जिल्हा, भंडारा जिल्हा, वर्धा जिल्हा, बुलढाणा जिल्हा, वाशिम जिल्हा, यवतमाळ जिल्हा असे एकूण १५ संघ सहभागी होणार असून सुमारे ३०० पैलवान, २५ रेफ्री व ५० कार्यकर्ते अचलपूर येथे दाखल होणार आहेत. सर्वांच्या निवास व भोजनाची उत्कृष्ट व्यवस्था आयोजकांकडून करण्यात आली आहे.

स्पर्धेत प्रथमच विदर्भ केसरी विजेत्यांना रोख पारितोषिक, चांदीची गदा, मेडल, प्रमाणपत्र तसेच होंडा शाईन मोटरसायकल देण्यात येणार आहे. तसेच प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी अनुक्रमे ३१०००, ११००० रुपये अशी बक्षिसे देण्यात येणार आहेत. महिला ओपन गटाला ५०,००० रुपये बक्षीस ठेवण्यात आले आहे. विविध वजन गटांमध्ये एकूण सहा लाख रुपयांची रोख बक्षिसे वितरित केली जाणार आहेत. दिनांक १६ एप्रिल रोजी सकाळी १० ते १ वाजेपर्यंत सर्व पैलवानांचे वजन होणार आहे. त्याच दिवशी सायंकाळी उद्घाटन समारंभ रामदासजी तडस अध्यक्ष महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ, प्रवीण तायडे आमदार (अचलपूर), महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ उपाध्यक्ष डॉ संजय तिरथकर, भारतीय जनता पार्टी चे अध्यक्ष प्रभुदास भिलावेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे. बक्षीस वितरण समारंभ अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अध्यक्ष महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघमा रामदासजी तडस व आमदार राजेश वानखडे यांच्या हस्ते होणार आहे.

# नारी शक्ती वंदन अभियान : सशक्त महिला, सशक्त समाजाकडे भारताचे भक्कम पाऊल

प्रतिनिधी १२ एप्रिल

**अमरावती :** नारी शक्ती वंदन अभियानाच्या माध्यमातून महिलांच्या सशक्तीकरणासाठी देशभरात जनजागृती व सक्रिय सहभाग वाढविण्याचा प्रयत्न होत आहे. 'नारी शक्ती : सशक्त महिला, सशक्त समाज' या संकल्पनेला केंद्रस्थानी ठेवून हा उपक्रम महिलांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय सहभागाला बळकटी देण्याचा संदेश देत आहे.

जागतिक स्तरावरील संशोधनातून हे सातत्याने स्पष्ट झाले आहे की, जेव्हा अधिक महिला कामकाजाच्या क्षेत्रात सहभागी होतात, तेव्हा देशाची अर्थव्यवस्था अधिक सक्षम होते आणि समाजाचा




सर्वांगीण विकास घडून येतो. भारतात गेल्या दशकात महिलांच्या सशक्तीकरणाच्या दिशेने अनेक महत्त्वपूर्ण बदल घडले आहेत. विविध शासकीय योजनांमुळे महिलांच्या जीवनमानात सुधारणा झाली असून आर्थिक व आरोग्यविषयक सशक्तीकरणाला चालना मिळाली आहे. राजकीय क्षेत्रातही महिलांचा सहभाग सातत्याने वाढत आहे. ङ्गशासनात महिला – भारताच्या लोकशाहीचा पुढील टप्पाङ्ग ही संकल्पना आता प्रत्यक्षात उतरताना दिसत आहे. पंचायत राज व्यवस्थेमध्ये महिलांची वाढती उपस्थिती हे दर्शवते की महिला प्रभावी नेतृत्व देऊ शकतात आणि समाजात सकारात्मक बदल घडवू शकतात. गेल्या दशकात आरोग्य, जीवनमान व शिक्षण या क्षेत्रांमध्येही महिलांनी उल्लेखनीय प्रगती केली आहे. या सर्व प्रयत्नांचा परिणाम म्हणून ङ्गमहिला नेतृत्वाखालील भारताचा पुढील अध्यायङ्ग आता आकार घेत आहे.

नारी शक्ती वंदन अधिनियम हा नव्या युगाची चाहूल देणारा ठरत असून महिलांच्या प्रतिनिधित्वाला व नेतृत्वाला नवी दिशा देण्याचे कार्य करणार आहे. या प्रसंगी लक्ष ॲकेडमी, स्पर्धा परीक्षा डॉ. सौ. प्रिती तट्टे, स्वयंसीध्दा संयोजिका, एमआयडीसी डॉ. मोनिका उमक, महाराष्ट्र ग्राम दर्पण, अमरावती गायत्री देशमुख, भारतीय जनता पार्टी महिला अध्यक्ष अनिता तिखिले, तसेच सावली महिला बचत गट च्या छाया गिरोळकर यांनी आपले विचार व्यक्त करून महिलांच्या सशक्तीकरणाच्या या अभियानाला अधिक बळ देण्याचे आवाहन केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

रविवार दि १२ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## जिल्ह्याची जमेची बाजू ओळखून गॅझेटियर अद्ययावत प्रक्रियेला गती द्या - डॉ .किरण कुलकर्णी

**वाशीम :** जिल्हा गॅझेटिअर हा ज्ञानकोश सदृश्य ग्रंथ असून त्यामध्ये जिल्ह्याचा भूगोल, अर्थव्यवस्था च विकास, प्रशासन, लोक व त्यांची संस्कृती, सामाजिक सेवा व संस्था तसेच प्रेक्षणीय स्थळांची सखोल माहिती दिलेली असते. दर्शनिका विभागाद्वारे गॅझेटिअरचे काम हाती घेतले आहे.जिल्हा गॅझेटियर हा जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचा, इतिहासाचा आणि सांस्कृतिक वारशाचा आरसा असून त्यामध्ये अचूक, अद्ययावत व विश्वासार्ह माहितीचा समावेश करणे अत्यंत आवश्यक आहे.जिल्ह्याची जमेची बाजू ओळखून गॅझेटियर अद्ययावत प्रक्रियेला गती द्यावी असे प्रतिपादन मराठी भाषा आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव तथा जिल्ह्याचे पालक सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी केले.जिल्हा गॅझेटियरच्या अद्ययावत प्रक्रियेचा आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, उपवनसंरक्षक अभिजित वायकोस, अप्पर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी संजय राठोड यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# खनिकर्म अधिकाऱ्याचा गजब कारभार, अवैध उत्खननास लावला हातभार !

## *जिल्हा खनिकर्म अधिकारी राठोड यांनी दिली अवैध गौण उत्खननाची परवानगी * याला म्हणतात 'चोरांच्या उलट्या बोंबा'

● किरण क्षार @ कारंजा ●

कारंजा तहसीलदार यांनी मौजे खानापूर येथील गट नंबर १३१ मध्ये अभिनव विजयकुमार अग्रवाल याचे अवैद्य उत्खनन थांबवून व त्याबाबत ईटीएस द्वारे मोजणी करण्याचे पत्र जिल्हा खानीकर्म अधिकारी यांना दिल्यानंतरही जिल्हा खनीकर्म अधिकारी विनय पि. राठोड यांनी त्याच १३१ गट क्रमांकावर व त्याच जागेवर तहसील कार्यालयामध्ये प्रकरण न्याय प्रविष्ट असताना व या विषयाची सर्व माहिती असताना मुरूम तस्कराशी हात मिळवणी करून पुन्हा २१०० ब्रास अवैद्य मुरूम उत्खनन करण्याची परवानगी दिली. हा सर्व प्रकार मा. जिल्हाधिकारी साहेब यांना माहीत नसेल का ? कारण परवानगी पत्रावर त्यांची स्वाक्षरी आहे.आणि आता अतिरिक्त मुरूम उत्खननाचे मोजमाप कसे होईल.असा प्रश्न उपस्थित होत आहे.

सविस्तर माहिती अशी की मौजे खानापूर येथे गट क्रमांक १३१ वर अभिनव विजय कुमार अग्रवाल रा.मुर्तीजापुर यांनी अवैद्य गौण उत्खनन केल्याची तक्रार अंकूश कडू यांनी दिनांक २१/१/२०२६ रोजी मा.तहसीलदार कारंजा यांच्याकडे केली होती.त्यावर तहसीलदार कारंजा यांनी मंडल अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी खानापूर यांच्या मार्फत प्रत्यक्ष मोक्यावर स्थळ निरीक्षण अहवाल दि.२२/१/२६ रोजी मागितला त्या अहवालामध्ये,संदर्भ क्र.२ नुसार मंडळ अधिकारी, खेर्डा बु.व ग्राम महसूल अधिकारी खानापूर यांचा अहवाल प्राप्त असून,मौजे खानापूर ता.कारंजा येथील शेत गट नं.१३१ एकुण क्षेत्रफळ ७.३५ हे.आर. जमीनीपैकी ३.२४ हे.आर.जमीन अभिनव विजय अग्रवाल यांचे मालकीची असून,सदर जमीनीमध्ये मा.जिल्हाधिकारी, वाशिम यांचे आदेश क्र.एमएनएल-३७/ खानापूर/०४/२०२५-२६ नुसार.०.५० हे.आर.जमीन क्षेत्रामधील २१०० ब्रास मुरुमाची दिनांक २९/१२/ २०२५ ते ३१/०१/२०२६ पर्यंत गौण खनिज उत्खनन करण्याकरीता परवानगी देण्यात आलेली आहे.प्रत्यक्ष मोक्यावर स्थळ निरिक्षण केले



असता,सदर शेताच्या उत्तर-पश्चिम भागात अंदाजे ९०६६० व खोली अंदाजे ४ मीटर उत्खनन केलेले दिसून आले.सदर खदान मालक यांनी आज पर्यंत ४१०० ब्रास गौण खनिज उत्खनन बद्दल स्वामित्व धनाचा भरणा केलेला आहे,परंतु प्रत्यक्षात त्यांनी जास्त उत्खनन केल्याचे दिसून येते.तरी उपरोक्त उत्खनन बाबत तांत्रिक विभागाकडून मोजणी करुन त्यांनी किती उत्खनन केले हे निश्चित करता येईल असे मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांनी त्यांचे अहवालामध्ये नमुद केले आहे.तरी आपणास मौजे खानापूर ता.कारंजा येथील शेत गट नं.१३१ मधील क्षेत्रफळ ७.३५ हे.आर. जमीनीपैकी ३.२४ हे.आर. या क्षेत्राची ई.टी.एस द्वारे मोजणी करुन मिळावी ही असे पत्र दि.९/३/२६ रोजी माननीय तहसीलदार कारंजा यांनीच जिल्हा खनिकर्म अधिकारी यांना पाठविले,एवढे असून सुद्धा जिल्हा खनिकर्म अधिकारी विनय राठोड यांनी दि.२३/३/२६ रोजी अभिनव विजय कुमार अग्रवाल याला त्याच गट नंबर वर व त्याच जागेवर २१०० ब्रास मुरूम उत्खननाची परवानगी दिली.या सर्व प्रकरणाची तक्रार पुन्हा दि.७/४/२६ रोजी जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली आणि हा सर्व प्रकार जिल्हाधिकारी साहेब यांच्या लक्षात आणून दिला,तेव्हा जिल्हा खनिकर्म अधिकारी राठोड यांनी पुन्हा उपविभागीय अधिकारी कारंजा यांना पत्र दिले,आपण तक्रार अर्जातील मुद्द्यानुसार सविस्तर चौकशी व नियमानुसार कारवाई करावी याला म्हणतात 'चोराच्या उलट्या बोंबा' अशी चर्चा होत आहे.

## थोडक्यात

### सत्यशोधक समाजाच्यावतीने महात्मा फुले यांची जयंती साजरी



● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●

सत्यशोधक समाजाच्या वतीने सत्यशोधक समाजाचे संस्थापक, क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची १९९वी जयंती पिंप्री सरहद येथे मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या विचारांना विनम्र अभिवादन केले. त्यानंतर भारतीय स्वाभिमानी संघाचे विभागीय अध्यक्ष मा. धम्मदास वाकुडे तसेच सत्यशोधक समाजाचे जिल्हा कार्याध्यक्ष माधवराव शेवाळे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना महात्मा फुले यांच्या महान जीवनकार्यावर प्रकाश टाकला. या आवाहनाला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सामाजिक समता, शिक्षण आणि न्यायाच्या मूल्यांचा प्रसार करण्याची प्रतिज्ञा केली.या कार्यक्रमासाठी गावातील तसेच पंचक्रोशीतील बहुजन समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन फिरोज शहा यांनी केले, तर आभार प्रदर्शन व आयोजन सत्यशोधक समाज, रिसोड तालुका अध्यक्ष भगवान भांदुर्गे यांनी केले.यावेळी उपस्थित मान्यवरसरपंच स्वप्निल देशमुख, माजी सरपंच सतीश गाभणे, प्रसन्नजित देशमुख सुधाकर गाभणे, शंकर गाभणे, सुभाष हजारे, महादेव वाघमारे, शेषराव नाईकवाडे, एकनाथ भांदुर्गे, जगन राऊत, बबन गवळी, आनंदा गाभणे, सचिन काळे, सह गावकरी आदी मान्यवर उपस्थित होते.

## जिल्ह्यात गुणवत्तापूर्ण व नाविन्यपूर्ण उपक्रम अंमलबजावणीला प्राधान्य द्या -पालक सचिव




● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यात सुरू असलेल्या विविध विकास प्रकल्पांची अंमलबजावणी गुणवत्तापूर्ण होणे अत्यावश्यक आहे. सर्व विभागांनी परस्पर समन्वय राखून कामांची गती वाढवावी आणि नाविन्यपूर्ण उपक्रम अंमलबजावणीला प्राधान्य द्या, असे प्रतिपादन मराठी भाषा आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव तथा जिल्ह्याचे पालक सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या जिल्हा आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, उपवनसंरक्षक अभिजित वायकोस, अप्पर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी संजय राठोड यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख? अधिकारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान १०० कोटीपेक्षा अधिक किंमतीच्या विविध महत्त्वाच्या प्रकल्पांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यामध्ये मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, पोहरादेवी विकास आराखडा, जलसंपदा विभागाचे प्रकल्प, कौशल्य विकास उपक्रम, पायाभूत सुविधा विकास कामे, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संस्था, संत श्री. सेवालाल महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, खासदार निधी तसेच ई-साक्षी पोर्टल आणि महास्ट्राईड-मित्र, जिल्हा विकास आराखडा, वार्षिक कृती आराखडा २६-२७ या योजनांचा समावेश होता. पालक सचिव डॉ.श्री कुलकर्णी यांनी विशेषतः प्रलंबित कामांबाबत कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच प्रत्येक प्रकल्पाची प्रगती नियमितपणे तपासून अडचणी त्वरित दूर करण्याचे निर्देशही दिले. कौशल्य विकासाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पासंदर्भात मार्गदर्शन करताना पालक सचिव डॉ. कुलकर्णी म्हणाले की, जिल्ह्यातील स्किल्ड मॅनपॉवरचा अनुशेष भरून काढण्यासाठी प्रभावी नियोजन करणे आवश्यक आहे. उद्योग क्षेत्राच्या गरजांनुसार कौशल्य विकास उपक्रम राबवून युवकांना रोजगारक्षम बनविण्यावर भर द्यावा. तसेच ई-साक्षी पोर्टल संदर्भात त्यांनी स्पष्ट निर्देश देत लॉगिन व पोर्टलायझेशनमधील तांत्रिक चुका टाळण्याचे सांगितले.

पोर्टलवरील माहिती वेळोवेळी अद्ययावत ठेवावी, तसेच नागरिकाभिमुख दृष्टीकोन ठेवून कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात आला. जिल्ह्यातील विकासकामांना अधिक गती मिळणार असून प्रशासन अधिक सजग व उत्तरदायी पद्धतीने कार्य करेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.संचालन जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर यांनी केले.तर उपस्थितांचे आभार जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत यांनी मानले.

## पद्मतिर्थ सरोवर परिसरास तिर्थक्षेत्र दर्जा देण्याची मागणी...

# राज्याच्या पर्यटन सचिवांनी केली पाहणी !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशिम जिल्हयातील श्रीक्षेत्र वाशिम येथे अतिप्राचिन पद्मतीर्थ सरोवर आहे.पद्मआकाराचे असलेले हे सरोवर विविध वैशिष्ठ आणि प्राचिन बाबींनी प्रसिद्ध आहे. या परिसराची पर्यटन सचिव कुळकर्णी यांनी पाहणी केली. यावेळी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर उपस्थित होते. परिसराची पाहणी करतांना परिसराच्या विकासाबाबत चर्चा करून परिसराला पर्यटनाचा दर्जा द्यावा अशी मागणी जगदिश व्यास सामाजिक कार्यकर्ते आशिष कोठारी, नगर सेवक गणेश खंडाळकर, शुभम डालीया यांनी केली.




या सरोवराचा उल्लेख पद्मपुराणात असून ब्रह्मदेवाला पहिले पाच मस्तक होते त्यातील एक मस्तक भगवान शिवाने तोडून टाकले.ब्रह्महत्येचे पातक नष्ट करण्यासाठी प्रत्यक्ष शिवभगवान स्नानासाठी याच सरोवरात आले.तेंव्हापासून या पद्मतीर्थाच्या काठावर भगवान शंकर पद्मेश्वर नावाने वास्तव्यात आहेत.त्यामुळे पद्मतीर्थात स्नान केल्याने पातक नष्ट होतात ही सर्वांची अवधारणा आहे.म्हणून हजारो भाविक स्नानासाठी येथे येत असतात.या तीर्थाचे अजुन विशेष म्हणजे ऋषी अगस्ती आणि ऋषी दधीची यांचा संबंध या तीर्थाशी असल्याचा उल्लेख आहे.या सरोवरात विसर्जित केलेल्या अस्थि विरघळुन जातात त्या मुळे महाराष्ट्रभरातून श्रद्धाळू भक्त अस्थिविसर्जनासाठी येथेच येतात.सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ आणि इस्त्रो चे सदस्य आर.एन.शुक्ल यांनी इथल्या पाण्याचा अभ्यास व्हावा म्हणून इथे भेट देखिल दिली होती.

भारतात फार कमी ठिकाणी असते असे कार्तिकस्वामीचे मंदिर या ठिकाणी आहे.कार्तीक महिन्यात कार्तिकस्वामीचा दीपोत्सव हजारो भक्तांच्या उपस्थितीत येथे होतो.विदर्भातील कार्तीकस्वामीचे हे एकमेव मंदिर असावे. याच सरोवर परिसरात सतीची वृन्दावने आहेत ज्यांची पूजा मोठ्या संख्येत सौभाग्यवती माता भगिनी करतात.सौभाग्याची मनोकामना करतात.गणेशपुराणात उल्लेखित नवसाला पावणाऱ्या सिध्द गणेशाचे मंदिर याच सरोवराच्या काठावर आहे.मनोकामना पुर्ण करतो म्हणून दर चतुर्थीला हजारो गणेशभक्त या गणपतीच्या दर्शनासाठी येतात.याच परिसरात विदेही संत श्री.रानडे बाबा आणि समर्थ सद्गुरू श्री.नारायण महाराज यांचे समाधी मंदिर आहे.श्री.नारायण महाराजांच्या पुण्यतिथीला महाराष्ट्रातून भक्त येतात आणि भव्य सोहळ्याचे आयोजन येथे होत असते.सालासार हनुमान मंदिर पद्मतीर्थाच्या काठावर असून कालसर्प शांतीसाठी लोक याच मंदिरात सरोवरावरकाठी विविध ठिकाणाहून येतात.पद्मपुराणात उल्लेखिल्याप्रमाणे हे सरोवर मोक्षदायी आहे.त्यामुळे येथे श्राद्धकर्म आणि दशक्रिया विधी केली तर पितरांना मोक्ष मिळतो हा सर्वांचा विश्वास आहे.त्यामुळे त्र्यंबकेश्वर नंतर हेच स्थान मोक्षदायी आहे. दूरदुरून लोक येथे दशक्रियेसाठी येतात.याशिवाय हे प्राचिन सरोवर प्रेक्षणीय स्थळ देखील आहे. या सरोवराचा आकारा कमळासारखा आहे.मध्यभागी महादेवाची सुंदर पिंड ज्यामध्ये गंडकी नदीतील शालिग्राम लिंगस्थानी आहे.हे मंदिर पाण्यात असल्यामुळे मंदिरात जाण्यासाठी पुल आहे.निळेशार पाणी,त्यात पुलासह मंदिर,काठावरची मंदिरे , वृक्षवल्ली ,पताकाम्हणजे पाहताक्षणी नेत्रदीपक आणि मनमोहक असे चित्र दिसते. लाखो भक्त इथे श्रद्धेने,आस्थेने ,निष्ठेने तर येतातच पण सुंदर तळे असल्यामुळे पर्यटक देखिल उत्सुकतेने येतात. इथे अस्थि विरघळतात म्हणून अभ्यासक अभ्यासासाठी तर सामान्यजन कुतूहल म्हणून येतात. सद्य स्थितित पद्मेश्वर आरतीमंडळ येथे विविध उत्सव आणि नित्य आरती करीत असते.आपणास विनंती की आमच्या निवेदनाचा सकारात्मक विचार करुन पौराणिक, ऐतिहासीक, भौगिलिक आणि पर्यटनास योग्य वारसा असलेल्या या तीर्थाच्या विकासाठी कार्यवाही करावी !

# जय ज्योती, जय क्रांतीच्या गजराने शहर दणाणले !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

सामाजिक क्रांतीचे अग्रदूत क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले यांचा १९९ वा जयंती महोत्सव तसेच द्विशताब्दी वर्षोत्सवानिमित्त शहरात दि. ११ एप्रिल रोजी भव्य मोटारसायकल सद्भावना रॅली काढण्यात आली. या रॅलीत जय ज्योती, जय क्रांती च्या गजराने संपूर्ण शहर दणाणून गेले होते.

क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले जयंती उत्सव समितीच्या वतीने विविध कार्यक्रम होत आहेत. शनिवारी क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीदिनी सकाळीच क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक येथे हरार्पण व अभिवादन करण्यासाठी गर्दी जमली होती. सकाळी नऊ वाजता नियोजित वेळी हाराफुलांनी सजलेल्या रथात फुले दांपत्यांची वेशभूषा केलेली अनेक जोडपी विराजमान झाली होती. या रथाच्या समोर वाशिमचे नगराध्यक्ष अनिल केंदळे, डॉ. रवी जाधव, माजी नगराध्यक्ष लक्ष्मणराव इंगोले, डॉ विजय कानडे यांच्यासह विविध मान्यवरांनी हिरवी झेंडी दाखवून रॅलीचे उद्घाटन केले.

या रॅलीमध्ये सर्वप्रथम महिलांच्या मोटरसायकल व त्यामागे पुरुषांच्या मोटरसायकल शिस्तीत लावून रॅलीची सुरुवात झाली. ही रॅली देवपेठ छत्रपती शिवाजी महाराज चौक, पाटणी चौक, बाबासाहेब आंबेडकर चौक, दिघेवाडी, परळकर चौक, राजनी चौक, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले चौक, गणेश पेठ, संत सावता महाराज मंदिर मार्गे काढण्यात आली. नंतर फुले स्मारक परिसरात रॅलीचा समारोप करण्यात आला. या रॅलीत जय ज्योती, जय, क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले की जय, आदी घोषणा देण्यात आल्या. या घोषणांनी शहर दणाणून गेले होते. अत्यंत शिस्तप्रिय आणि उत्साहाच्या वातावरणात ही सद्भावना रॅली पार पडली. रॅलीत ठिकठिकाणी नाश्ता व पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. या रॅलीत सर्व जाती धर्मातील समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. रॅली दरम्यान पोलीस प्रशासनाने आपली चोख भूमिका पार पाडली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उत्सव समितीच्या कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले. फुले दांपत्यांची वेशभूषा ठरले आकर्षण रॅलीत फुलांनी तसेच क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या प्रतिमांनी सजलेल्या रथात शिक्षक प्रशांत मोहळे आणि सविता मोहळे यांनी फुले दांपत्यांची वेशभूषा साकारली. सोबतच अनेक छोट्या मुला, मुलींनी महात्मा जोतीराव फुले व सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा साकारली. त्यांच्यासोबत रॅलीत सहभागी झालेल्या समाज बांधवांनी सेल्फी घेतले.







### ठिकठिकाणी नाश्ता व पाण्याची व्यवस्था

मोटार सायकल सद्भावना रॅली दरम्यान ठिकठिकाणी नाश्ता व चहापाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. माजी नगराध्यक्ष लक्ष्मणराव इंगोले यांनी दरवर्षीप्रमाणे याही वर्षी स्मारक परिसरात नास्ता आणि चहा व पाण्याची व्यवस्था केली तसेच न. प. उपाध्यक्ष राजू भांदुर्गे यांनी नाश्त्याची तसेच उमेश मोहळे, संतोष वानखेडे यांच्यासह अनेकांनी रॅली दरम्यान विविध ठिकाणी पाण्याचे वाटप केले.


### मोटारसायकल सद्भावना रॅलीत शेकडोंचा सहभाग फुले दांपत्यांची वेशभूषा ठरली रॅलीचे आकर्षण

## त्रिवेंद्रम येथील क्रीडा स्पर्धेत वाशीमच्या चमूची उत्कृष्ट कामगिरी !

### गोविंद व्यवहारे सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्राने सन्मानित...

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

त्रिवेंद्रम येथे नुकत्याच पार पडलेल्या क्रीडा स्पर्धेत वाशीम येथील क्रीडा चमुने आपल्या खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करून आयोजक व प्रेक्षकांची वाहवा मिळवली . यावेळी माजी सैनिक गोविंद व्यवहारे यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले .



महाराष्ट्र मास्टर्स ॲथलेटिक्स असोसिएशनने आयोजित केलेल्या क्रीडा स्पर्धेत येथील चमुने ४६ व्या राष्ट्रीय मास्टर्स ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२६ मध्ये केरळची राजधानी तिवेंद्रम येथे सुद्धा क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली . या क्रीडा चमूमध्ये शिंदे , रविंद्र नप्ते , रामदास उखळे , राहुल व्यवहारे , सतिष व्यवहारे व गोविंद व्यवहारे यांचा समावेश होता . या चमुस वाशीम येथील जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोंडे यांनी मार्गदर्शन करून खेळाडूंचा उत्साह वाढवीला . त्रिवेंद्रम येथे पाच दिवस या क्रीडा प्रकाराचे आयोजन करण्यात आले होते . सर्व खेळाडूंनी आपापल्या क्रीडाप्रकारात विशेष कामगिरी करून वाशीम जिल्ह्याचे नाव उंचावले . माजी सैनिक गोविंद व्यवहारे यांनी यापुर्वी सुद्धा विविध क्रीडा प्रकारात सहभाग नोंदवून स्वतःच्या व जिल्ह्याच्या लौकिकात भर घातली . या कामगिरीबद्दल वाशीमच्या चमुचे सर्वत्र कौतुक होत आहे .

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलढाणा
रविवार, दि. १२ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# सिलिंडरचा स्फोट, घराला आग ; आठ जखमी

♦ दगडवाडी येथील घटनाः शॉर्ट सर्किटमुळे लागली आग



प्रतिनिधी १२ एप्रिल

**देऊळगावराजा :** तालुक्यातील चिखली मार्गावरील दगडवाडी येथे शुक्रवारी (दि. १०) मध्यरात्री 'शॉर्ट सर्किट' मुळे लागलेल्या भीषण आगीत घरातील गॅस सिलिंडरचा स्फोट होऊन आठ जण जखमी झाले, तसेच घरासह धान्य, साहित्य आणि महत्त्वाची कागदपत्रे जळून लाखोंचे नुकसान झाले. सुदैवाने अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला.

कारभारी दिपाजी नागरे यांच्या घराला मध्यरात्री अचानक आग लागली. शेजारील सौंदा उगलमुगले यांच्या लक्षात येताच आरडाओरड करून त्यांनी गावकऱ्यांना सतर्क केले. गावकऱ्यांनी तत्काळ धाव घेत प्रारंभी पाण्याने आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. या घटनेची सरपंचांनी पोलिस निरीक्षक ब्रह्मा गिरी यांना माहिती दिली. त्यानंतर घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाने घटनास्थळ गाठले. गावकरी आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करत असतानाच घरातील गॅस सिलिंडरचा अचानक स्फोट झाला. या स्फोटामुळे छपरावरील पत्रे आणि दगड दूरवर फेकल्या गेले. यात मदतीसाठी धावलेले आठ जण जखमी झाले. आर्यन शंकर घुगे याच्या डोक्याला गंभीर मार लागला. या आगीत घरातील धान्य, घरगुती साहित्य, तसेच महत्त्वाची कागदपत्रे पूर्णतः जळून खाक झाली, तसेच आर्यन शंकर घुगे, सत्यभामा काशिराम उगलमुगले, चंद्रभागा छगन घुगे, गजानन बाजीराव घुगे, शारदा शिवाजी घुगे, शांताबाई कारभारी घुगे, संजय कारभारी घुगे व रंजना संतोष डोईफोडे हे जखमी झाले आहेत. आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचा अंदाज आहे. घटनास्थळी पोलिस निरीक्षक ब्रह्मा गिरी उपस्थित होते

# वाळू वाहतूक करणाऱ्या 10 टिप्परवर आरटीओची कारवाई

प्रतिनिधी १२ एप्रिल



**लोणार :** लोणार तहसील अंतर्गत खापरखेडा लाड येथील वाळू घाटावरून टिप्पर द्वारे अवैध व ओव्हरलोड वाळू वाहतूक करत असल्याने यासंदर्भात गावकऱ्यांनी बीबी पोलीस स्टेशनला तक्रार केली त्यावरून पोलिसांनी कारवाई करत रेतीचे टिप्पर ताब्यात घेतले आणि तपासणीसाठी आरटीओ, माहिती दिली. त्यावरून आरटीओ यांनी इलेक्ट्रॉनिक काट्यावर मोजमाप केले असताते क्षमतेपेक्षा जास्त रेती आढळल्याने आरटीओने धाडसी कारवाई करत त्या टिप्परवर तब्बल ७ लाख ८६ हजार रुपयांचा दंड ठोठावला. या कारवाईमुळे वाळू माफियामध्ये खळबळ उडाली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की ८ एप्रिल रोजी काही सजग ग्रामस्थांनी वाळू घाटावर सुरू असलेली अवैध वाहतूक रोखत बिबी पोलिस ठाण्याला माहिती दिली. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत काही टिप्पर ताब्यात घेतले. संबंधित टिप्पर चालकांकडे काही प्रमाणात रॉयल्टी आढळली, मात्र वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त वाळू भरलेली असल्याचे निदर्शनास आले. यानंतर तहसील प्रशासन व पोलिसांनी बुलढाणा प्रादेशिक परिवहन कार्यालयाला पाचारण केले. आरटीओ पथकाने इलेक्ट्रॉनिक काट्यावर वाहनांचे वजन तपासले असता अनेक टिप्पर ओव्हरलोड असल्याचे स्पष्ट झाल्याने याप्रकरणी १० टिप्परवर तसेच ३ वाहनांवर मोटार वाहन कायद्यान्वये एकूण ७ लाख ८६ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला. कारवाईदरम्यान मोटार वाहन निरीक्षक योगेश पाटील, सहाय्यक निरीक्षक निखिल ठाकूर, तसेच राजेश ढाकणे व वामन अडसर यांनी सहभाग घेतला.उपप्रादेशिक परिवहन अधिकारी रघुवीरसिंग दिलावर यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली.

# माझे गाव आरोग्य संपन्न गाव' अभियानांतर्गत कार्यशाळा

प्रतिनिधी १२ एप्रिल

**बुलढाणा :** 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव' अभियानांतर्गत जिल्हास्तरीय कार्यशाळा व आढावा सभा येथील वैद्यकीय महाविद्यालयात जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. बैठकीत जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या विविध आरोग्य योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्राथमिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करणे,नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जनजागृती वाढविणे तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर विशेष भर देण्यात आला. जिल्हा माता-बाल संगोपन अधिकारी डॉ. मिलिंद जाधव यांनी आरसीएच कार्यक्रमांतर्गत एचपीव्ही लसीकरणाचा तालुकानिहाय आढावा घेत उद्दिष्टपूर्तीसाठी महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. तर जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वर्षा गुट्टे यांनी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमाचा आढावा घेत संबंधित कामकाजाबाबत मार्गदर्शन केले.यावेळी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी रणजीत मंडाले यांनी विविध आरोग्य कार्यक्रम व जनजागृती उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश दिले.

ग्रामीण भागात सोशल मीडिया, स्थानिक माध्यमे, वृत्तपत्रे आणि यशोगाथांचा प्रभावी वापर करण्यावर विशेष भर देण्यात आला. तसेच कमी प्रगती असलेल्या कार्यक्रमांमध्ये सुधारणा करण्याच्या सूचना देण्यात आल्या. डब्ल्यूएचओचे डॉ. सम्यक खौरे यांनी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत मार्गदर्शन केले. बैठकीत तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी अभियानाशी संबंधित कामकाजाबाबत सादरीकरण केले.

# युगधर्म पब्लिक स्कूलचे विद्यार्थी राष्ट्रीयस्तरावर झळकले

प्रतिनिधी १२ एप्रिल

**खामगाव :** स्थानिक सूर्योदय एज्युकेशन सोसायटीद्वारे संचालित युगधर्म पब्लिक स्कूल, खामगाव येथील विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत राष्ट्रीय स्तरावर आपली छाप उमटवली आहे.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित तालुका, जिल्हा व विभागीय स्तरावरील स्पर्धांमध्ये युगधर्मच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत राष्ट्रीय स्तरासाठी पात्रता मिळवली आहे. सोबतच नुकत्याच पार पडलेल्या



राज्यस्तरीय स्पर्धेत खामगाव शहरासाठी अभिमानाची बाब म्हणजे युगधर्म पब्लिक स्कूल, खामगावच्या इयत्ता ७ वीतील विद्यार्थी कुमार कैवल्य शेलके याने सुवर्णपदक पटकावले. तसेच याच शाळेतील विद्यार्थी कुमार अर्णव देशमुख याने कांस्यपदक मिळवले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष श्री गोपालजी अग्रवाल यांनी पालक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री अनिरुद्ध आवचार यांनी विद्यार्थ्यांचा व पालकांचा सत्कार करून त्यांच्या यशाचे कौतुक केले. यावेळी अध्यक्ष श्री गोपालजी अग्रवाल यांनी विद्यार्थ्यांना आगामी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. युगधर्म पब्लिक स्कूल, खामगावच्या विद्यार्थ्यांच्या या राज्यस्तरीय यशाचे संपूर्ण खामगाव शहरात कौतुक होत आहे.

# एसआयआर'ची पूर्वतयारी अंतिम टप्प्यात; खामगावात ८८ टक्के मॅपिंग !

घरोघरी पडताळणी मोहिमेला वेगः उर्वरित काम लवकर पूर्ण करण्यासाठी प्रशासनाचे प्रयत्न

प्रतिनिधी १२ एप्रिल

**खामगाव :** राज्यात लवकरच राबविण्यात येणाऱ्या एसआयआर (मतदार यादी पडताळणी) प्रक्रियेची पूर्वतयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. खामगाव मतदारसंघात तब्बल ८८ टक्के मॅपिंगचे काम पूर्ण झाल्याची माहिती निवडणूक विभागाने दिली आहे. मतदार यादी अचूक, अद्ययावत आणि पारदर्शक करण्याच्या दृष्टीने ही प्रक्रिया महत्त्वाची मानली जात आहे. त्याअंतर्गत नियुक्त करण्यात आलेले बीएलओ (बूथ लेव्हल ऑफिसर) सध्या घरोघरी भेट देऊन नागरिकांची माहिती पडताळत आहेत. मतदारांची नावे, पत्ते, वय, स्थलांतरित मतदारांची स्थिती तसेच मृत व्यक्तींची नावे वगळण्याची प्रक्रिया यामध्ये केली जात आहे. खामगाव मतदारसंघात हे काम वेगाने सुरू असून बहुतांश भागात मॅपिंग पूर्ण झाले आहे. उर्वरित १२ टक्के कामही लवकरच पूर्ण करण्याचे उद्दिष्ट प्रशासनाने ठेवले आहे. प्रक्रियेमुळे भविष्यातील निवडणुकांसाठी अधिक अचूक मतदार यादी तयार होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.एसआयआर प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नागरिकांना सक्रिय सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. या मोहिमेअंतर्गत बीएलओमार्फत घरोघरी जाऊन मतदारांची माहिती पडताळली जात आहे.

# अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार कारवाईची मागणी

प्रतिनिधी १२ एप्रिल

**बुलढाणा :** अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार दाखल गुन्ह्यात अद्यापपर्यंत ठोस कारवाई न झाल्याच्या निषेधार्थ अण्णाभाऊ साठे सोशल फोरमच्या वतीने १० एप्रिल रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. संबंधित प्रकरणात तात्काळ कारवाई करून आरोपींना अटक करण्यात यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला.

निवेदनात नमूद केल्यानुसार, बुलढाणा शहर पोलीस स्टेशन येथे अप. नं. २७०/२०२१ अंतर्गत माजी आमदार विजयराज शिंदे यांच्यासह इतरांविरुद्ध भा. दं. वि. कलम १४३,



१४७,१४९,३२३, ५०४, ५०६ तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. हा गुन्हा दाखल होऊनही दीर्घ कालावधी उलटून गेला असताना अद्यापपर्यंत कोणतीही ठोस व निर्णायक कारवाई करण्यात आलेली नसल्याचा गंभीर आरोप फोरमच्या वतीने करण्यात आला आहे.सदर प्रकरणात आरोपींकडून अटकेच्या विरोधात दिनांक १० जून २०२१ रोजी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर सुनावणी पूर्ण होऊन आदेश प्राप्त झाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तथापि न्यायालयीन प्रक्रियेनंतरही स्थानिक पातळीवर अपेक्षित ती कारवाई झालेली नाही, याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. यापूर्वीही १८ मे २०२१ रोजी संबंधित प्रकरणात कारवाईसाठी स्मरणपत्र देण्यात आलेहोते. मात्र, त्या स्मरणपत्रावर कोणतीही ठोस दखल घेण्यात आलेली नसल्यामुळे आरोपींचे मनोबल वाढत असून, न्याय मिळण्यास विलंब होत असल्याची भावना समाजबांधवांमध्ये निर्माण झाली आहे. निवेदन सादर करताना सोपान पानपाटील, निवृत्त तांबे, विजय पारेकर, रामा जाधव, गजानन गायकवाड, दादाराव महाले, विनोद महाले, गणेश यंगड, दिगंबर पाटोळे, प्रवीण कांबळे निंबाजी साळवे यांच्यासह अण्णाभाऊ साठे सोशल फोरमचे पदाधिकारी वसमाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जागतिक होमिओपॅथी दिवस व रोगनिदान शिबिर

प्रतिनिधी १२ एप्रिल

**मेहकर :** येथील होमिओपॅथी डॉक्टर्स असोसिएशन व ग्रामीण रुग्णालय आयुष्य विभागातर्फे जागतिक होमिओपॅथी दिवस साजरा करून भव्य रोग निदान शिबिर संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. सुनिता हिवसे या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी व भव्य रोग निदान शिबिराच्या उद्घाटक केंद्रीय आयुष्य राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव यांच्या धर्मपत्नी सौ. राजश्रीताई प्रतापराव जाधव ह्या होत्या. तसेच मंचावर डॉ. धैर्यशील रहाटे, डॉ. गोविंद झंवर, डॉ. संतोष जुनघरे, डॉ. सचिन काळे, डॉ. किरण नागोलकर, डॉ. जैयस्वाल मॅडम, डॉ. कृष्णा शिंदे, डॉ. संजय



लाहोटी मंचावर उपस्थित होते.संपूर्ण तालुक्यातील सर्व होमिओपॅथी बंधू-भगिनी या कार्यक्रमास उपस्थित होते. सर्वप्रथम कार्यक्रमाच्या अध्यक्षा सौ. सुनीता हिवसे यांचा सत्कार डॉ. पवन मंत्री यांनी केला.तसेच प्रमुख अतिथी व रोग निदान शिबिराचे उ?द्घाटक सौ. राजश्रीताई जाधव यांचा सत्कार डॉ. धैर्यशील रहाटे व डॉ. जयस्वाल मॅडम यांनी केला.यावर्षी सीसीएमपी कोर्स पास झालेले डॉ. स्वप्निल चुकेवार, डॉ. तनुश्री देशमुख, डॉ. संजय लाहोटी, डॉ. अमोल सावळे, डॉ. शुभम इंगळे, डॉ. ज्योतीदिवटे, डॉ. ज्ञानेश्वर बाजड यांचा सत्कार सौ. राजश्रीताई जाधव व डॉ. हिवसे मॅडम यांच्याहस्ते करण्यात आला. जागतिक होमिओपॅथी दिवसा निमित्त डॉ. पूनम चांगाडे यांनी होमिओपॅथी बद्दल माहिती देऊन मार्गदर्शन केले.

## सिटी न्यूज सुपरफास्ट — संमिश्र

# अपघातानंतरच प्रशासनाला आली जाग

प्रतिनिधी १२ एप्रिल

**तेल्हारा :** तेल्हारा–माळेगाव बाजार रोडवरील रस्त्याच्या मधोमध पडून असलेला गौणखनिजाचा धोकादायक ढीग अखेर हटवण्यात आला असून मोठा अपघात होण्याचा धोका टळला आहे. मात्र, हा निर्णय अपघात घडल्यानंतरच घेतला गेल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून हा ढीग रस्त्यावर पडून होता. याबाबत वारंवार तक्रारी, तसेच 'दै. सिटी न्यूज सुपरफास्ट' मधून प्रसिद्ध झालेल्या बातमीतही संभाव्य अपघाताचा इशारा देण्यात आला होता. तरीही प्रशासनाने वेळेत दखल न घेतल्याने अखेर अपघात घडला आणि त्यानंतरच यंत्रणा जागी झाली. अपघातानंतर प्रशासनाने तातडीने हालचाल करत रस्त्यावरील गौणखनिज हटवले, मात्र तोपर्यंत उशीर झाल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. 'अपघात झाल्यानंतरच प्रशासन का जागं होतं?' असा संतप्त सवाल सर्वसामान्यांकडून विचारला जात आहे. या रस्त्यावरून दररोज प्रवास नागरिकांनी प्रतिक्रिया देताना सांगितले,

'आम्ही आधीपासून सांगत होतो, याबात सिटी न्यूज सुपरफास्ट या वृत्तपत्राने आवाज उठविला आणि बातमीही आली होती. यात सिटी न्यूज सुपरफास्टने जी चिंता व्यक्त केली होती. दुर्दैवाने तसेच झाले. त्यानंतर लगेच काम झाले. मग आधी का नाही? नागरिकांच्या जीवाची किंमत नाही का?' या संपूर्ण प्रकारामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांच्या सुरक्षेबाबत संवेदनशीलता दाखवण्याची गरज असून, भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी जबाबदारी निश्चित करण्याची मागणी होत आहे. अपघातानंतर तातडीने गौणखनिज हटवण्यात आले. संभाव्य मोठा धोका टळला. प्रशासनाच्या उशिरा झालेल्या कारवाईवर नागरिकांचा रोष भविष्यात तत्परतेने कार्यवाही करण्याची गरज अधोरेखित.

# पाटील समाज अकोलाच्या अध्यक्षपदी अशोकराव अमानकर तर सचिवपदी प्रदीप खाडे

प्रतिनिधी १२ एप्रिल

**अकोला :** पाटील समाज अकोला ची नूतन कार्यकारिणी घोषित करण्यात आली आहे. यात अध्यक्षपदावर अशोकराव अमानकर तर सचिव पदी प्रदीप खाडे यांची निवड करण्यात आली आहे. समाजाचे अध्यक्ष अशोकराव अमानकर, कार्याध्यक्ष सुनील जानोरकर यांच्या व इतरही सदस्यांच्या उपस्थितीत संपन्न झालेल्या एका सभेत ही नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. या कार्यकारिणीत पुढील प्रमाणे इतर पदाधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. कार्याध्यक्ष पदावर सुरेश गाढे पाटील यांची तर उपाध्यक्ष पदावर अविनाश नाकट व संदीप महल्ले पाटील यांची निवड करण्यात आली आहे. कोषाध्यक्षपदी विजय





बोरकर तर सहसचिव पदावर संजय लुंगे यांची वर्णी लावण्यात आली आहे. महिला प्रतिनिधी म्हणून सरिता वाकोडे, प्रा. डॉ. ममता इंगोले, ॲड. दिपाली जानोरकर व रेखा राऊत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदस्य पदावर अविनाश पाटील, डॉ. दिलीप मानकर, प्रकाश चतरकर, निलेश पवित्रकार, गजानन इंगळे, संजय मालोकार, पंकज जायले, वसंतराव घनोकार, विक्रम जानोरकर, ॲड. संतोष गावंडे, हर्षल भांबेरे, श्याम कुलट, शरद पांडे, सुधाकर वानखडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. समाजातील ज्येष्ठ व्यक्ती विनायकराव शेळके, राजेंद्र मोहोकार, दिनकरराव सरप, सुभाषराव म्हैसणे, विनायकराव गावंडे, वासुदेवराव कडू, देवराव पाटील हागे, प्रा. दत्तात्रय भाकरे हे कार्यकारीनीत मार्गदर्शक म्हणून कार्यकारिणीस मार्गदर्शन करतील. समाजातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामासाठी मदत करणे, महिलांचे मेळावे आयोजित करून त्यांना मार्गदर्शन करणे, वधू वर परिचय मेळावे, समाजातील मुला मुलींच्या संसारात काही अडचण निर्माण झाल्यास त्यांना मोफत कायदेशीर सल्ला देणे आदी समाजोपयोगी कार्यांवर भर देणार आहे. असे नवनियुक्त अध्यक्ष अशोकराव अमानकर यांनी या सभेत आपले मनोगत व्यक्त करताना जाहीर केले. सभेचे संचालन व आभार प्रदर्शन प्रदीप खाडे यांनी केले.

# न्यू इंग्लिश हायस्कूल मध्ये महात्मा फुले जयंती साजरी

प्रतिनिधी १२ एप्रिल

**अकोला :** क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्वीशताब्दी वर्षानिमित्त न्यू इंग्लिश हायस्कूल मध्ये कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेला प्राचार्य माधव मुनशी यांनी हार अर्पण. केले सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी त्यांच्या फोटोला आदरांजली अर्पण केली.

महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी निमित्त विविध कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. सो अलका मुंडे ,पर्यवेक्षक यांनी महात्मा ज्योतिराव फुले यांच्या कार्याची विस्तृत माहिती विद्यार्थ्यांना दिली. यावेळी



उपमुख्याध्यापक उदय हातवळणे, पर्यवेक्षक ओझरकर, सर्व शिक्षक शिक्षकेतर बंधू उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

रविवार, दि. १२ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# महात्मा फुले जयंती शोभायात्रेने दुमदुमले शहर

प्रतिनिधी १२ एप्रिल

**अकोला :** क्रांतीसूर्य महात्मा फुले यांच्या जयंती निमित्त सार्वजनिक जयंती उत्सव समितीतर्फे शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेत महात्मा फुले यांच्या जीवन चरित्रावर आधारित देखावे, वेशभूषा केलेले समाज बांधव सहभागी झाले होते. लेझीम ढोल ताशांच्या गजराने अकोला नगरी दुमदुमून गेली. शोभायात्रेची सुरुवात महाराणा प्रताप बगीचा सिटी कोतवाली पासून झाली. गांधी रोड बसस्थानक मार्गे अशोक वाटिकेत समारोप करण्यात आला. विविध देखाव्यांनी वेधले लक्ष. सुरुवातीला महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुतळ्याला महापौर





शारदाताई खेडकर यांच्या हस्ते हार अर्पण केले. यावेळी आमदार रणधीर सावरकर, आमदार नितीन देशमुख, आमदार साजिद खान पठाण, स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल, माजी आमदार बळीराम सिरस्कार, महेश गणगणे, डॉ. प्रवीण लोखंडे, डॉ. अमोल रावणकर, प्रा. ललित काळबांडे, सुहासिनी धोत्रे, वंचितचे जिल्हा अध्यक्ष प्रमोद देंडवे, मायाताई इतरकार, नगरसेविका कल्पनाताई गोटफोडे, महात्मा फुले समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष गजानन म्हैसने, महानगर अध्यक्ष श्रीराम रावकर, सावता परिषदेचे राज्य महासचिव प्रवीण वाघमारे, जिल्हाध्यक्ष लक्ष्मणराव निखाडे आदी उपस्थित होते. शोभायात्रेचे मुख्य आयोजक प्रकाश तायडे, जयंत मसने, डॉ. संतोष हुशे, सुभाष सातव, ॲडव्होकेट प्रकाश दाते, रामदास खंडारे, आशिष ढोमणे, मनीष हिवराळे, संगीताताई आत्राम, अर्चनाताई म्हैसने, सुमित्रा निखाडे, वनिता राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा फुले सार्वजनिक उत्सव समितीचे अध्यक्ष संजय गोटफोडे, कार्याध्यक्ष गणेश काळबांडे, स्वागत अध्यक्ष उमेश म्हैसने, सचिव मनोहर उगले, उपाध्यक्ष सुनील उंबरकर, सुरेश कासोदे, गणेश म्हैसने, कोषाध्यक्ष नितीन देऊळकार, महिला आघाडी अध्यक्ष गायत्री वाघमारे, युवक आघाडीचे अध्यक्ष नीरज रहाटे, अभिलाष तायडे, अक्षय नागापुरे यांच्या नेतृत्वामध्ये शोभायात्रा काढण्यात आली. बहुजन समाज संघटना सामील होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकाश तायडे यांनी तर संचालन प्रा. रमेश भड व आभार प्रदर्शन प्रा. अशोक रहाटे यांनी केले.

# अक्षय तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर बालविवाह लावाल तर जाल जेलात

प्रतिनिधी १२ एप्रिल

**अकोला :** अक्षय तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर होणाऱ्या संभाव्य बालविवाहांबाबत जिल्हा प्रशासन सतर्क आहे. 'बालविवाह मुक्त भारत' अभियानांतर्गत, राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाच्या निर्देशांनुसार सर्व विभागांना कठोर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अक्षय तृतीयेच्या सात दिवस आधी आणि सात दिवस नंतर एक विशेष मोहीम राबवली जाईल. तालुका स्तरावर तयार केलेली पथके देखरेख ठेवतील आणि प्रत्येक कारवाईचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयात पाठवला जाईल. याव्यतिरिक्त, देखरेखीसाठी प्रत्येक तालुका स्तरावर एक संयुक्त पथक (समिती) स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. बालविवाहात सहभागी असलेल्या किंवा ते आयोजित करणाऱ्या कोणालाही सोडले जाणार नाही, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. बालविवाहाची माहिती मिळताच तात्काळ छापा

## ♦ मंदिरे, मंगल कार्यालयावर प्रशासनाचे राहील लक्ष



टाकला जाईल आणि विवाह थांबवला जाईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. मुलांना सुरक्षित ताब्यात घेतले जाईल. जर विवाह आधीच झाला असेल, तर पालकांना आणि आयोजकांना माहिती दिली जाईल. कोणताही संशयास्पद प्रकार वेळेवर रोखण्यासाठी मंदिरे, मॅरेज कार्यालय, मंगल कार्यालय आणि लॉनवर विशेष निगराणी ठेवली जात आहे.

### निष्काळजीपणाविरुद्ध कारवाई केली जाईल

◆प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, बालविवाह कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नाहीत. निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर खटलाही चालवला जाईल. नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, अशी कोणतीही माहिती मिळाल्यास तात्काळ पोलिसांना कळवावे. वयाचा पुरावा न तपासता विवाह लावणाऱ्या पुजारी, काझीना सुद्धा जबाबदार धरण्याचे निर्देशही प्रशासनाने दिले आहेत.

# रशियाच्या ब्रिक्स मेलडी मध्ये शंतनू मायीचा सहभाग

प्रतिनिधी १२ एप्रिल

**अकोला :** अकोल्यातील गुणी तबला वादक शंतनू नरेंद्र मायी रशियाच्या ब्रिक्स मेलडी इंटरनॅशनल कॉन्सर्ट मध्ये सहभागी होणार आहे. पाच भारतीय कलावंत कला सादर करतील. विविध देशातील नामवंत कलावंत कॉन्सर्ट मध्ये सहभागी होणार असून भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी शंतनू मायीला मिळाली आहे. १७ ते २६ एप्रिल दरम्यान आयोजन आहे. तर, २५ रोजी वाद्य वादन राहणार आहे. त्यामध्ये भारतीय तसेच अन्य देशातील कलावंत कला सादर करतील. शंतनू मायी युवा तबला वादक म्हणून तो सध्या



नावलौकिक प्राप्त करीत आहे. अयोध्येत श्री रामलला प्राणप्रतिष्ठा उत्सवात तबला वादक म्हणून सहभागी होण्याची संधी शंतनूला मिळाली होती. लहानपणापासून तबला वादनाची त्याला आवड आहे. वडील नरेंद्र मायी यांच्या कडून त्याने प्राथमिक धडे घेतले. त्यानंतर विवेक देशपांडे आणि पं. योगेश शम्सी यांच्याकडे शंतनू शिकला. आज राष्ट्रीय आंतरराष्ट्रीयस्तरावर तो कला सादर करीत आहे.

# 30 एप्रिल पर्यंत ई–केवायसी दुरुस्त न केल्यास लाडक्या बहिणी लाभापासून वंचित

प्रतिनिधी १२ एप्रिल

**अकोला :** राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'त नावनोंदणी केलेल्या महिलांसाठी खूपच कमी वेळ उरला आहे. जिल्ह्यातील हजारो महिलांच्या ई-केवायसीमध्ये चुका आढळून आल्या असून, त्या दुरुस्त करण्यासाठी त्यांना सुरुवातीला ३१ मार्चपर्यंतची मुदत देण्यात आली होती. या कालावधीतही, मोठ्या संख्येने महिला दुरुस्ती करण्यात अयशस्वी ठरल्या. या पार्श्वभूमीवर, सरकारने २ एप्रिल रोजी एक नवीन आदेश जारी करून अंतिम मुदत ३० एप्रिलपर्यंत वाढवली आहे. ही शेवटची संधी मानली जात आहे. यानंतर दुरुस्तीसाठी कोणतीही संधी मिळण्याची शक्यता

## ♦ जिल्हा महिला व बाल विकास कार्यालयाबाहेर रांगा



नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, ज्या महिलांनी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत आपले ई-केवायसी पूर्ण केले नाही, त्यांचा योजनेचा निधी आधीच थांबवण्यात आला आहे. या लाभार्थ्यांना पुन्हा लाभ मिळण्याची शक्यता खूपच कमी आहे. अकोला जिल्ह्यात या योजनेचे लाखो लाभार्थी आहेत. मोठ्या संख्येने महिलांचे ई-केवायसी प्रलंबित किंवा चुकीचे असल्यामुळे, जिल्ह्यात सध्या महिला आणि बाल विकास कार्यालयाबाहेर दररोज लांबच लांब रांगा दिसत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, ज्या महिलांचे ई-केवायसी चुकीचे होते आणि ज्यांनी ते वेळेत दुरुस्त केले आहे, केवळ त्याच महिलांना पुन्हा लाभ मिळू शकतील. महिला 'आपले सरकार' ई-सेवा केंद्र, त्यांच्या मोबाईल फोनवरून किंवा जवळच्या इंटरनेट कॅफेमधून ही प्रक्रिया पूर्ण करू शकतात. जिल्हा महिला आणि बाल विकास अधिकारी यांनी महिलांना आवाहन केले आहे की, त्यांनी ३० एप्रिल २०२६ पर्यंत आपले ई-केवायसी दुरुस्त करावेत, जेणेकरून त्यांना कोणत्याही त्रासाशिवाय योजनेचा लाभ घेणे सुरू ठेवता येईल.

# चान्नी येथे लोंबलेली विद्युत तार वाहनावर कोसळली

प्रतिनिधी १२ एप्रिल

**पातूर :** तालुक्यातील सस्ती वीज उपकेंद्र अंतर्गत चान्नी पोलीस स्टेशनसमोर धोकादायक स्थितीत लोंबकळत असलेला विद्युत तार थेट चालत्या वाहनावर कोसळल्याची घटना शनिवार ११ एप्रिल रोजी दुपारी घडली.

सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, तार वाहनाला लागून तुटल्याचे कारण पुढे करत संबंधित वाहनचालकाला महावितरण विभागाच्या एका कर्मचाऱ्याने पोलीस ठाण्यात वाहन जमा करण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे.

चान्नी पोलीस स्टेशनसमोरून जाणारा हा मुख्य मार्ग असून, येथे दररोज एसटी बससह मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. अशा वर्दळीच्या ठिकाणी विद्युत तार धोकादायक अवस्थेत लोंबकळत असणे हे महावितरण विभागाच्या निष्काळजीपणाचे द्योतक असल्याची संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

घटनेनंतरचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, त्यामध्ये संबंधित ठिकाणी विद्युत तार जमिनीपासून अत्यंत कमी उंचीवर लोंबकळत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. तसेच कर्मचाऱ्यांकडून वाहनचालकाला दमदाटी करत पैसे घेतल्याचेही बोलले जात आहे.

वाहन चालकाकडून अशा प्रकारे पैसे घेणे चुकीचे आहे. याबाबत चौकशी करण्यात येईल. चौकशीनंतर गैरकायदेशीर पैसे घेणाऱ्या कर्मचाऱ्याविरुद्ध योग्य ती कारवाई केली जाईल, अशी प्रतिक्रीया गौरव निकुंबे, कनिष्ठ अभियंता, वीज उपकेंद्र सस्ती यांनी दिली.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त अशोक वाटिकेत सजावट

प्रतिनिधी १२ एप्रिल

**अकोला :** अशोक वाटिका येथे १४ एप्रिलच्या पार्श्वभूमीवर मोठ्या उत्साहात तयारी सुरू आहे. परिसराची आकर्षक सजावट करण्यात आल्याने वातावरण उत्सवमय झाले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने अकोल्यातील अशोक वाटिका परिसर सुशोभित करण्यात आला आहे. ठिकठिकाणी रंगरंगोटी, स्वच्छता आणि आकर्षक सजावटीमुळे संपूर्ण परिसर खुलून दिसत आहे.

## ♦ जयंतीनिमित्त जय्यत तयारी, नागरिकांमध्ये उत्साह




१४ एप्रिलचा औचित्य साधून प्रशासन आणि स्थानिक नागरिकांच्या सहभागातून येथे जय्यत तयारी करण्यात आली आहे. प्रकाशयोजना, स्वच्छता मोहीम आणि विविध सजावटीच्या माध्यमातून अशोक वाटिकेला विशेष रूप देण्यात आले आहे.या तयारीमुळे नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# आंब्याची आवक वाढली मात्र भाव चढे

प्रतिनिधी १२ एप्रिल

**अकोला :** . उन्हाळ्यात आंबे खाण्याची मजा असते. विविध प्रकारचे आंबे सध्या बाजारात आलेले आहे. परंतु आंबे सध्या महाग आहेत. १५० ते १८० रूपये किलो दराने आंबे विकत घ्यावे लागत आहे. अक्षय्य तृतीयेच्या पूजेसाठी आंबे लागतात. परंतु त्यापूर्वीच आंबे बाजारात आलेले असल्याने ग्राहकांची मागणी दिसते. कारपेटने पिकवलेले आंबे उपलब्ध करून दिले जात असल्याची ओरड होत आहे.

सध्या बदाम आंबे १२० रुपये किलो प्रमाणे विकत घ्यावे लागत आहेत. आंब्याची आवक बरी



असली तरी मध्यंतरी झालेला अवकाळी पाऊस, गारपीट याचा परिणाम आंब्यावर झाला. त्यामुळे आवक प्रभावित झालेली दिसून येते. सध्या कारपेटचा वापर करून आंबे पिकवले जात असतील तर या गैर प्रकाराला आळा घालण्यासाठी अन्न औषधी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देण्याची गरज आहे. शेवटी नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न आहे.

# आता कामचुकार कंत्राटदारांना 'ब्लॅकलिस्ट'करणार

प्रतिनिधी १२ एप्रिल

**अकोला :** महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा येत्या सोमवार, १३ एप्रिल रोजी पार पडणार आहे. या सभेचा अजेंडा पाहता, प्रशासन आता कमालीच्या आक्रमक पवित्र्यात असल्याचे स्पष्ट दिसत आहे. विशेषतः पालिकेची फसवणूक करणाऱ्या कंत्राटदारांचे धाबे दणाणले आहेत.

महानगरपालिकेच्या कामात दिरंगाई करणाऱ्या आणि वसुलीची रक्कम थकवणाऱ्या कंत्राटदारांवर आता 'सर्जिकल स्ट्राईक' करण्याची तयारी पूर्ण झाली आहे. ज्या कंत्राटदारांनी वेळेत बांधकामे पूर्ण केली नाहीत किंवा पालिकेचा पैसा दाबून ठेवला आहे, अशांची नोंदणी रद्द करून त्यांना थेट काळ्या यादीत टाकण्याचा मोठा निर्णय या सभेत घेतला जाणार आहे. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे भ्रष्ट कंत्राटदारांमध्ये मोठी खळबळ माजली आहे. शहराच्या हद्दवाढ भागात उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. या भागातील तहान भागवण्यासाठी जिल्हा नियोजन समितीकडे तातडीने प्रस्ताव सादर करण्याबाबत सभेत खलबते होतील. हद्दवाढ भागातील नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकू देणार नाही, असा आक्रमक पवित्रा लोकप्रतिनिधी घेण्याची शक्यता आहे. शहरातील कचरा व्यवस्थापनाचा पूर्णपणे बोजवारा उडाला असून, सध्याचे घंटागाडीचे नियोजन सपशेल अपयशी ठरले आहे. त्यामुळे आता ही जुनी यंत्रणा मोडीत काढून नव्याने निविदा प्रक्रिया राबवण्याचा विचार सुरू आहे. यामध्ये घरगुती ६०० कचरा घंटागाडी शुल्क हे करात लावण्याचा व अप्रत्यक्षपणे करवाढीचा मुद्दा गाजणार असून विरोधक पुन्हा एकदा शहरात या विषयावरुन रान करणार आहे.

# अतिक्रमण काढताना गांधी चौकातच कारवाई टिळक रोडकडे दुर्लक्ष ?

प्रतिनिधी १२ एप्रिल

**अकोला :** अतिक्रमण हटविण्यात महानगरपालिकेची दुहेरी भूमिका उघड

अकोला. महानगरपालिकेच्या अतिक्रमण हटाव मोहिमेवर आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शहरातील काही भागात कडक कारवाई होत असताना, काही ठिकाणी मात्र प्रशासनाकडून स्पष्टपणे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

अकोला शहरातील गांधी चौक परिसरात महानगरपालिकेकडून अतिक्रमण हटविण्याची मोहीम जोरात सुरू आहे. मात्र याचवेळी न्यू क्लॉथ मार्केटसमोरील भागात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण असूनही ते हटविण्यासाठी प्रशासनाचा एकही कर्मचारी पोहोचत नसल्याचे चित्र दिसत आहे.महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागात ५० कर्मचाऱ्यांची ठेकेदारी पद्धतीवर नियुक्ती करण्यात आली आहे. तरीही शहरातील सर्वच भागात समान आणि प्रभावी कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. विशेष म्हणजे, टिळक रोडसारख्या गर्दीच्या व महत्त्वाच्या भागात अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडी आणि नागरिकांना त्रास होत असताना देखील प्रशासनाकडून दुर्लक्ष का केले जात आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.

# पुरातन वटवृक्ष देतोय पर्यावरण संवर्धनाचा संदेश

## कोथळी बुद्रुक येथील शंभर वर्ष जुना वटवृक्ष

प्रतिनिधी १२ एप्रिल

**अकोला :** बार्शीटाकळी तालुक्यातील कोथळी बुद्रुक येथील मुंगसाजी संस्थान परिसरातील प्राचीन वटवृक्ष सध्या भाविक आणि पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. अनेक वर्षांचा इतिहास लाभलेल्या या वटवृक्षाला धार्मिक तसेच सांस्कृतिक दृष्टिकोनातून विशेष महत्त्व आहे.

बार्शीटाकळी तालुक्यातील कोथळी बुद्रुक येथील प्राचीन वटवृक्ष शेकडो वर्षे जुना असून मुंगसाजी महाराजांच्या काळापासून तो येथे अस्तित्वात आहे. त्या काळी या वृक्षाखाली बसून अनेक संतांनी साधना केल्याचीही श्रद्धा व्यक्त केली जाते. त्यामुळे येथे येणारे भाविक या वटवृक्षाला पवित्र मानून पूजा-अर्चा करतात.या वटवृक्षाच्या विशाल फांद्या आणि दाट छायेमुळे परिसरात एक प्रसन्न आणि शांत वातावरण निर्माण होते. विशेषतः उन्हाळ्यात या ठिकाणी थंडावा अनुभवण्यासाठी भाविक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने येथे येतात. काहीजण येथे



बसून ध्यान-धारणा करताना दिसतात.स्थानिक प्रशासन आणि संस्थानच्या वतीने या वटवृक्षाचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. वृक्षाभोवती स्वच्छता राखणे, संरक्षक उपाययोजना करणे यावर भर दिला जात आहे.ग्रामस्थांच्या मते, हा वटवृक्ष केवळ धार्मिक श्रद्धेचे प्रतीक नसून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देतो. त्यामुळे या ऐतिहासिक वारशाचे जतन करणे ही सर्वांची जबाबदारी असल्याची भावना व्यक्त होत आहे. या वटवृक्षा बाबत स्थानिक पुजारी यांनी माहिती दिली आहे.

# जिल्ह्यातील दहा गावांत नळयोजना विशेष दुरुस्ती होणार!

प्रतिनिधी १२ एप्रिल

**अकोला :** जिल्ह्यातील पाणीटंचाई निवारणासाठी १० गावांमध्ये नळयोजना विशेष दुरुस्तीची दहा कामे हाती घेण्यात येणार आहेत. या कामांसाठी १ कोटी ५६ लाख ८१ हजार रुपयांचा खर्च अपेक्षित असून प्रस्तावित उपाययोजनांना जिलाधिकाऱ्यांनी प्रशासकीय मंजुरी दिली आहे. सर्व कामे ३० एप्रिलपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

उन्हाळ्यात ग्रामीण भागातील रहिवाशी नागरिकांना पिण्यासाठी पाणी सहज उपलब्ध व्हावे, यासाठी जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या वतीने प्रत्येक वर्षी संभाव्य पाणी टंचाई निवारण कृती आराखडा तयार करण्यात येतो. त्याअंतर्गत यावर्षी जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाने यंदा पाणी टंचाई निवारण आराखडा तयार करण्यास विलंब केला होता. परंतु अखेर ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने आराखडा तयार करून जिल्हा परिषदेच्या सीईओ यांच्याकडे सादर केला होता. त्याला सीईओंनी मंजुरी दिल्यानंतर जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या मंजुरीसाठी आराखडा सादर करण्यात आला. आराखड्याला जिल्हाधिकारी यांनी फेब्रुवारीमध्ये मंजुरी दिली होती. परंतु जुन्या आराखड्यात काही त्रुटी राहिल्याने सुधारित पाणीटंचाई निवारण आराखडा मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार जिल्ह्यात पाणी टंचाईची कामे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

### अशी होणार आहेत कामे

◆अकोला तालुक्यातील यावलखेड येथे २८ लाख ९७हजार रुपयांत, चाचोंडी येथे २८ लाख ८७ हजार रुपयांत, आगर येथे १६ लाख १८ हजार रुपयांत, गांधीग्राम येथे १५ लाख ९३ हजार रुपयांत तसेच रोहणा येथे २ लाख ७२ हजार तसेच पातूर तालुक्यातील बाभुळगाव येथे २७ लाख ८ हजार रुपये, भंडारज बु, येथे २१ लाख ८ हजार रुपये खर्चुन कामे केली जाणार आहेत. बाळापूर तालुक्यातील अंत्री मलकापूर येथे ६ लाख रुपये, वझेगाव येथे ५ लाख रुपये, तर मूर्तिजापूर तालुक्यातील माना येथे ४ लाख ९५ हजार रुपयांत नळयोजना दुरुस्तीची कामे होणार आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK